रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३३३
www.ramprahar.com

शुक्रवार, २० जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

महाडच्या वाळण कोंडी येथील केबल ब्रिजवर पर्यटकांना बंदी/२

नवी मुंबईतील ५०१ इमारती धोकादायक जाहीर/६

मेजर लीग क्रिकेट स्पर्धेत मॅक्सवेलचे दमदार शतक/८

## संत ज्ञानेश्वर निघाले पांडुरंगाच्या भेटीला; पालखीचे प्रस्थान



**आळंदी :** संत तुकाराम महाराजांच्या पालखीने बुधवारी देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान केल्यानंतर गुरुवारी (दि. १९) दुसऱ्या दिवशी आळंदी येथून संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. आषाढी वारी हा संपूर्ण महाराष्ट्राचा उत्सव मानला जातो. या काळात राज्यभरात भक्ती, उत्साह आणि चैतन्याचे वातावरण असते. वारीच्या निमित्ताने संतांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करतात. आळंदीतही प्रस्थान सोहळा रंगला.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. दि.बा. पाटील यांचे नाव लवकरात लवकर द्यावे

## सर्वपक्षीय कृती समितीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी; सकारात्मक प्रतिसाद

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव लवकरात लवकर देण्यात यावे, अशी मागणी लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने गुरुवारी (दि. १९) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली. या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ‘दिबां’चे नाव विमानतळाला मिळावे यासाठी आवश्यक ते प्रयत्न करू, असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.



नवी मुंबई विमानतळाचे काम पूर्णत्वास येत असून आगामी काळात हे विमानतळ कार्यान्वित होणार आहे. या पार्श्वभूमीवर विमानतळाला भूमिपुत्रांचे नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे यासाठी सर्वपक्षीय कृती समितीच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेऊन निवेदन दिले.

या शिष्टमंडळात माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, राज्याचे मंत्री गणेश नाईक यांच्यासह समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी मंत्री जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष माजी खासदार संजीव नाईक, खजिनदार जे.डी. तांडेल, कार्यकारिणी सदस्य अतुल पाटील, नवी मुंबईचे माजी महापौर सागर नाईक आदींचा समावेश होता.

शिष्टमंडळाने केलेल्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ‘दिबां’च्या नावासाठी केंद्रीय स्तरावर प्रयत्न व पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले.



# रायगडात जोरदार पाऊस; जनजीवन विस्कळीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात बुधवारपासून पडत असलेल्या जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. जिल्ह्यात गुरुवारी (दि. १९) सकाळी संपलेल्या २४ तासात सरासरी १४९.७९ मिमी पावसाची नोंद झाली. मुरूड वगळता सर्व तालुक्यांमध्ये १०० मिमीपेक्षा जास्त सरासरीने पाऊस पडला. त्यामुळे काही भागात रस्त्यांवर पाणी आले. परिणामी या मार्गांवरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती, तर जिल्ह्यातील पाच तालुक्यातील शाळा आणि महाविद्यालये बंद होती.

मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील सर्व नद्या दुथडी भरून वाहत होत्या. अंबा, कुंडलिका या दोन नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे नागोठणे व रोहा शहरातील सखल भागात पाणी शिरले. पाताळगंगा नदी इशारा पातळीवरून वाहत होती.

**पर्जन्यवृष्टीची तालुकानिहाय आकडेवारी**
(मिलीमीटरमध्ये)

माथेरान २६२, खालापूर २०५, पनवेल २०३.०६, पेण १९५, अलिबाग १९०, श्रीवर्धन १७७, उरण १६६, सुधागड १५६, कर्जत १३२, म्हसळा व रोहा प्रत्येकी १३०, महाड १२६, माणगाव व तळा प्रत्येकी १०६, पोलादपूर १०५, मुरूड ६७, एकूण २३९६.०६, सरासरी १४९.७९.

अलिबाग शहरातही पाणी शिरले.

अलिबाग तालुक्यातील रोहा-रामराजमार्गे पाणी आल्यामुळे या मार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. भोनंग येथे रस्त्यावरून पाणी वाहत होते. उमटे धरणाचे पाणी परिसरात शिरले होते. भुते येथील शांताराम नागू सानकर यांच्या पक्क्या घराचे अंशतः नुकसान झाले. जगन्नाथ म्हात्रे यांच्या म्हशीला विजेचा धक्का लागून म्हशीचा मृत्यू झाला. नागाव येथील प्रशांत अनंत घरत यांच्या घराशेजारील झाडावर वीज पडून हे झाड घरावर पडल्याने पक्क्या घराचे अंशतः नुकसान झाले आहे.

सुधागड तालुक्यात पाली पोलीस ठाणे हद्दीतील अंबा नदीवरील पाली-खोपोली मार्गावर उन्हेरे फाटा येथील पुलावर अंबा नदीचे पाणी आले होते. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली. खुरावले फाटा येथील भोराव गावाकडे जाणाऱ्या अंतर्गत रोडवरील पुलावरदेखील पाणी आले होते. त्यामुळे हा पूल वाहतुकीकरिता बंद करण्यात आला. पाली शहरानजीकचा अंबा नदीवरील पूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. पेडली येथील पूलही वाहतुकीसाठी बंद होता. **(पान २ वर..)**

## निवडक

### जेजुरी अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना दोन लाखांची मदत

**नवी दिल्ली :** जेजुरी-मोरगाव रस्त्यावर बुधवारी रात्री भरधाव मोटारीने टेम्पोला दिलेल्या धडकेत नऊ जण ठार झाले आहेत. या अपघातात सहा जण जखमी झाले असून त्यातील चौघांची स्थिती गंभीर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स पोस्ट करत मृतांप्रति शोक व्यक्त केला आहे तसेच मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाखांची आणि जखमींसाठी प्रत्येकी ५० हजारांची मदत जाहीर केली आहे.

### स्पाइसजेटचे विमान टेकऑफनंतर तांत्रिक बिघाडामुळे पुन्हा विमानतळावर

**हैदराबाद :** तेलंगणाची राजधानी हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून तिरुपतीला जाणारे स्पाइसजेटचे विमान गुरुवारी (दि. १९) सकाळी टेकऑफ घेतल्यानंतर विमानतळावर पुन्हा परतले. विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचे म्हटले जात आहे. या विमानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

### आजपासून भारत-इंग्लंड पहिली कसोटी रंगणार

**हेडिंग्ले :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेतील पहिला सामना शुक्रवार (दि. २०)पासून हेडिंग्ले येथे खेळला जाणार आहे. पहिल्यांदाच शुबमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करीत आहे. **(अधिक वृत्त पान ८ वर..)**

## अभीष्टचिंतन



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.** (अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

## कोल्हापूरमध्ये स्मशानभूमीत अघोरी प्रकार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूरच्या शिरोळ तालुक्यातील उदगाव येथील स्मशानभूमीत अंधश्रद्धेचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्या ठिकाणी महिला आणि पुरुषांकडून नग्न होऊन करणी, भानामतीसारखे अघोरी कृत्य केले जात असल्याचे समोर आले असून हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

उदगावमधील कृष्णा नदीकाठावर असलेल्या वैकुंठधाम स्मशानभूमीत गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरू होता. येथे महिला आणि पुरुष भरदिवसा नग्न होऊन करणी, भानामतीसारखे विधी करत होते. स्मशानभूमीतील अंत्यसंस्कार केलेल्या जागेवरील रक्षा बाजूला सारून त्या ठिकाणी बाहुली, नारळ यांची पूजा केली जात होती तसेच नावाच्या चिठ्ठ्यांना सुया टोचून करणी करण्याचा प्रकारही उघडकीस आला आहे.

अंधश्रद्धेची घटना सीसीटीव्हीत कैद



स्मशानभूमीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हे सर्व किळसवाणे प्रकार कैद झाले आहेत. या फुटेजच्या आधारे पोलीस अधिक तपास करत आहेत.

## भाजप जनतेला दिलेला शब्द पूर्ण करणारा पक्ष

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन; सुकापूरमध्ये संकल्प सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष आणि या पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकार जनतेला दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करणारे आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. १९) सुकापूर येथे आयोजित संकल्प सभेत केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील भाजपप्रणित सरकारला ११ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सरकारच्या जनहितार्थ कामांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी संकल्प सभांचे आयोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने पनवेल तालुका पूर्ण मंडळाच्या वतीने सुकापूर येथील लक्ष्मी पब्लिक स्कूलमध्ये संकल्प सभा झाली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मोदी सरकारच्या मागील ११ वर्षांतील प्रमुख कामगिरीचा विस्तृत आढावा सादर केला.

या सभेला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, तालुका चिटणीस यतीन पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच, सदस्य उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# पनवेल मनपा हद्दीत शास्ती माफी लवकरात लवकर लागू करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

### नागरिकांना दिलासा द्या -खासदार श्रीरंग बारणे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या टॅक्ससंदर्भात नगरविकास खात्याचे प्रधान सचिव डॉ. के.एच. गोविंदराज यांनी मुंबईत आयोजित केलेल्या बैठकीला खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत शास्ती माफीच्या संदर्भात चर्चा झाली असता शास्ती माफी लवकरात लवकर लागू करावी, जास्तीत जास्त शास्ती माफी देण्यात यावी आणि त्याचबरोबर पूर्वीच्या काळात ज्या मालमत्ताधारकांनी शास्ती भरली आहे त्यांनाही पुढे भरायच्या करामधून आधी भरलेल्या शास्तीची रक्कम वगळण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.

या संदर्भात खासदार श्रीरंग बारणे यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये नागरिकांनी भरलेली शास्ती पुढील टॅक्स भरणातून वगळण्यात आल्याची प्रकरणे असल्याबाबत माहिती दिली व त्याचा अभ्यास करून याबाबत पनवेल महापालिका हद्दीतील नागरिकांना दिलासा द्यावा, अशा पद्धतीची मागणी केली.

या संदर्भामध्ये शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणीसुद्धा आमदार प्रशांत ठाकूर यांनी या बैठकीत केली.





# मुसळधार पाऊस; रायगडात ठिकठिकाणी पाणी साचले

## अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली, वाहतुकीवर परिणाम

**पाली: प्रतिनिधी**

पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. मुसळधार पावसामुळे गुरुवारी (ता.१९) येथील वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील अंबा नदी पुलाजवळ दोन्ही बाजूला रस्त्यावर सखल भागात पाणी भरल्याने दोन्ही बाजूची वाहतूक बंद होती. तसेच या मार्गावर दापोडे गावाजवळ,व भेरव येथील अंबा नदी पूल पाण्याखाली गेल्याने येथील वाहतूक देखील बंद होती.

पाली रवाळजे मार्गावर नांदगाव येथील सरस्वती नदी पुलावरून पाणी गेले व वाहतूक ठप्प झाली. तसेच शिहू झोतिरपाडा गावांना देखील पुराच्या पाण्याने वेढा दिला. ठिकठिकाणी मातीचा मोठा भराव झाल्याने यावर्षी पाण्याचा प्रवाह व पुराची तीव्रता अधिक असल्याचे नागरिकांनी सांगितले. यामुळे सुधागड तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले होते. परिणामी कामासाठी निघालेले चाकरमानी, प्रवासी तसेच विद्यार्थी यांचे हाल झाले.

सतत सुरु असलेल्या पावसामुळे पाली पोलीस ठाणे हद्दीतील अंबा नदीवरील पाली वाकण खोपोली मार्गावर उन्हेरे व पाली जवळ अंबा नदीची पातळी वाढली असल्याकारणाने पुलाच्या दोन्ही बाजूस मुख्य रोडवर पाणी भरले. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून दोन्ही बाजूची वाहतूक बॅरेकेटींगच्या सहायने बंद करण्यात आली व योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला. सरस्वती नदीची पातळी वाढल्यामुळे नांदगाव येथील नुकताच झालेल्या पुलावरून देखील पाणी गेले. त्यामुळे पाली रवाळजे मार्गावर तेथील दोन्ही बाजूची वाहतूक बंद करण्यात आली.

पाली वाघजाई नगर येथील किल्ल्याच्या मातीचा भाग व दगड खाली आले. लागलीच खबरदारी घेत पाली नगरपंचायत च्या नगराध्यक्ष प्रणाली शेळके यांनी या ठिकाणी भेट दिली व नागरिकांना सुरक्षित व दक्ष राहण्याचे आवाहन केले. माती व दगड खाली आल्यामुळे येथील नागरिक भयभीत आहेत.



### पूल झाला, पण उपयोग शून्य!

***अंबा नदीवर नुकताच उंच व रुंद असा मोठा पूल बांधण्यात आला आहे. या आधी अंबा नदीवरील जुना पूल हा अरुंद व उंचीने छोटा होता. तसेच क्षमता देखील कमी होती. त्यामुळे नवीन रुंद व उंच पूल बांधल्यामुळे ही समस्या संपुष्टात येऊन पावसाळ्यात वाहतूक सुरळीत राहील, अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेला व प्रवाशांना होती. मात्र घडले भलतेच, नवीन मोठा व रुंद पूल झाला मात्र त्याच्या दोन्ही बाजूचा रस्ता हा खाली असल्यामुळे आता पुलावरून पाणी न जाता या दोन्ही बाजूच्या रस्त्यावर पाणी साचते व वाहत आहे. आणि परिणामी दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होत आहे. एमएसआरडीसी प्रशासनाने या दोन्ही बाजूला मोरी टाकणे किंवा उंच रस्ता करणे गरजेचे होते. मात्र तसे न झाल्यामुळे हकनाक नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.***



रोहा : शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात रात्रभर मुसळधार पाऊस पडत होता. त्यामुळे नदी, नाले तुडुंब भरून वाहू लागले. कुंडलिका नदी ही दुथडी भरून वाहू लागल्याने नदीवर असलेल्या रोहा अष्टमीला जोडणारा जुना पूल वाहतुकीस बंद करण्यात आला असून पुलावर खबरदारी म्हणून पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

## पाणी शिरल्याने लहान विद्यार्थी अडकले



**पाली : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे माणगाव तालुक्यातील भिरा धरणाची धोक्याची पाणी पातळी वाढल्यामुळे गुरुवारी (ता. १९) धरणाचे दरवाजे उघडण्यात आले. परिणामी मुंबई गोवा महामार्गावरील कोलाड जवळील गोवे गावात पाणी शिरले होते. यावेळी शाळेतून घरी जाणारे पाच लहान विद्यार्थी वाटेत अडकून पडले होते . या लहान मुलांना सह्याद्री वन्यजीव संरक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी सुखरूप सुरक्षित ठिकाणी हलविले. सुरक्षा जॅकेट घालून या विद्यार्थ्यांना पाण्यातून बाहेर काढण्यात आले

## पोलादपूरमध्ये संततधार; नद्या दुथडी भरून वाहू लागल्या

**पोलादपूर: प्रतिनिधी**

गेल्या चोवीस तासात पावसाची संततधार सुरु असल्याने पोलादपूर तालुक्यातील पाचही प्रमुख नद्यांसह उपनद्यांना दुथडी भरून वाहण्यासाठी कारणीभूत ठरली आहे. पोलादपूर शहर आणि तालुक्यातील ग्रामीण भागातील जनजीवन ठप्प झाले. गुरूवारी ५ वाजता पावसाची एकूण नोंद १०७३ मी.मी. झाल्याने यंदा पोलादपूरच्या इतिहासात प्रथमच १९ जूनपर्यंत पावसाची हजारी नोंद झाल्याचे दिसून आले.पोलादपूर तालुक्यात गुरूवारी सकाळी पावसाची १०५ मी.मी. नोंद झाल्यानंतर आतापर्यंत ९४९ मि.मी. पाऊस झाल्याचे तहसिल कार्यालयातील आपत्ती निवारण कार्यालयाद्वारे सांगण्यात आले.

पोलादपूर तालुक्यातील सावित्री, ढवळी, कामथी, घोडवनी, चोळई या पाच प्रमुख नद्यांसह सर्व उपनद्यांची पात्रं दुथडी भरून वाहू लागल्याचे सार्वत्रिक दृश्य असून गुरूवारी दिवसभर पावसाची संततधार मोठ्या प्रमाणात सुरू राहिल्याने सावित्री नदीचे पात्र रानबाजिरे धरण ओव्हरफ्लो करून पोलादपूरच्या दि लेप्रसी मिशन हॉस्पिटलजवळ चोळई नदीचे पात्र आणि सावित्री नदीचे पात्र एकत्र झाल्यानंतर पोलादपूर शहरातील जुटयाच्या दोन्ही बाजूने पाण्याचा प्रवाह पोलादपूरमार्गे महाडच्या दिशेने वेगाने तुडूंब भरून वाहू लागला आहे. दरम्यान, धारवली ते आंग्रेकोंड रस्त्यावर लाल मातीचा ढिगारा आल्याने काही काळ वाहतूक ठप्प राहिली. लोहारे तुर्भे पुलालगतच्या कोल्हापूरी तंत्राच्या बंधाऱ्यापर्यंत उत्तरवाहिनी सावित्री नदीपात्राची पातळी आल्याचे दिसून आले.

पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावर सातारा जिल्हा हद्दीत दरड आल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली, असल्याने पोलादपूर ते आंबेनळी घाटरस्त्यावर शुकशुकाट होता. पोलादपूर तालुक्यात गुरूवारी सकाळी ८ वाजल्यापासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत १२४ मी.मी. पावसाची नोंद झाल्याने आजपर्यंतचा एकूण पाऊस १०७३ मी.मी. झाला आहे








## माझ्या राजकीय कारकिर्दीला हानी पोहचवण्याचे षड्यंत्र –आमदार दरेकर





**नवी मुंबई : बातमीदार**

टाईम्स महाराष्ट्र या वेबपोर्टलचे संपादक राजेश कोचरेकर यांनी पोर्टलवर भाजप गटनेते आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांच्याविरोधात हेतूपरस्पर निराधार व बदनामीकरक व्हिडीओ प्रसारित केला होता. या व्हिडीओची दखल घेत आमदार दरेकर यांनी मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांची भेट घेतली. माझ्या राजकीय कारकिर्दीला हानी पोहोचविण्यासाठी करण्यात आलेले हे मोठे षडयंत्र असून याची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सखोल चौकशी करावी आणि यात सहभागी असणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी तक्रार केली.

अपलोड केलेला व्हिडिओ हा नियोजित कटकारस्थान केलेला आहे, जो माझी प्रतिमा खराब करण्याच्या स्पष्ट हेतूने प्रसारित करण्यात आला होता. हा व्हिडिओ बनवण्यासाठी आणि प्रसारित करण्यासाठी मोठ्या निधीचा वापर करण्यात आल्याची शक्यता आहे. त्यामुळे वरील बाबी लक्षात घेता राजेश कोचरेकर, टाइम्स महाराष्ट्र युट्यूब चॅनेल आणि ज्यांनी हे षडयंत्र रचले त्यांच्यावर कलम ३५३, ३५६, ३०८ आणि भारतीय न्याय संहिताच्या विविध कलमांखाली, आयटी कायद्याच्या कलम ६६ अ अंतर्गत गुन्हा दाखल करावा, असेही तक्रारीत म्हटले आहे.

### मुंबईच्या साठ्ये महाविद्यालयात विद्यार्थिनीची आत्महत्या

**मुंबई :** विलेपार्ले येथील प्रसिद्ध साठ्ये महाविद्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून २१ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केली. संध्या पाठक असे तिचे नाव आहे. ही घटना गुरुवारी (दि. १९) सकाळी ७.१५च्या सुमारास घडली. या प्रकरणी विलेपार्ले पोलिसांनी अपमृत्यूचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

## बेपत्ता तरुणाचा मृतदेह सापडला; चौघे ताब्यात

**खालापूर : प्रतिनिधी**


खालापुरातील आजीवली गावातील तरुण हानीफ अली शहानवाज उर्फ सोनू ( वय ३५) हा दोन दिवसां पासुन बेपत्ता होता. तो बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या कुटुंबाने खालापूर पोलीसांत केली होती.



गुरुवारी हनीफ याचा मृतदेह लोणावळा येथील पवना धरणाजवळ असणाऱ्या हिंदगाव परीसरात सापडला असून लोणावळा पोलिसांनी खालापुरातील ४ तरुणांना संशयित म्हणून ताब्यात घेतले आहे. यामध्ये एक अल्पवयीन १७ वर्षाच्या मुलाचा सामावेश आहे.

हनीफ ऊर्फ सोनू हा आपल्या मित्रांसह १७ जुन रोजी लोणावळा येथे फिरावयास गेला होता. त्याचे मित्र आले परंतु तो घरी न आल्याने कुटुंबीयांनी पोलीसांत तक्रार केली होती. त्याचा मृतदेह लोणावळा येथे आढळल्याने पोलीसांनी त्याच्या सोबत फिरायला गेलेल्या आशिष चव्हाण ३० रा. डोणवत, शुभम यादव २७, अमर मोरे २६, व अल्पवयीन मुलगा प्रणय यादव १७, तिघेही रा आपटी. खालापूर यांना ताब्यात घेतले असून या तरुणां विषयी अधिक माहिती असल्यास लोणावळा पोलीसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महाडच्या वाळण कोंडी येथील केबल स्टे ब्रीज धोकादायक; पर्यटकांना बंदी



**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील वाळण कुंडी या प्रसिद्ध ठिकाणी काळ नदीवर असलेल्या लोखंडी केबल स्टेप ब्रिज धोकादायक असल्याने आजपासून हा पूल पर्यटकांसाठी व रहिवाशांसाठी बंद करण्यात आला आहे

महाड सार्वजनिक बांधकाम उप विभागाने जून महिन्यात केलेल्या सर्वेक्षणानुसार, रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील वाळण कोंडी येथील काळ नदी वरील संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध जागृत देवस्थान असलेल्या वरदायिनी माता मंदिराच्या परिसरातील ४० वर्षे जुना केबल स्टे ब्रीज हा पूर्णतः खराब व निकामी असल्याचे निदर्शनास आले आहे.

कुंभमेळा पूल दुर्घटनेच्या नंतर महाड तालुक्यातील अशा प्रकारच्या काही लोखंडी फुलांची पाहणी केली असता यामध्ये काळ नदीवरील हा पूल धोकादायक असल्याचा निदर्शनास आले आहे. हा पूल पादचारी वापरासाठी अत्यंत धोकादायक ठरत असल्याने, पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे त्याठिकाणी कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी महाड उपविभागीय अधिकारी पोपट ओमासे यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (३) अन्वये १८ जून ते १८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सदरचा पूल बंद करण्यात आल्याचे आदेश लागू केले आहे.

पान १ वरून

### रायगडात जोरदार पाऊस; जनजीवन विस्कळीत

पेण तालुक्यातील खरोशी व दुरशेत गावचे रस्ते जलमय होऊन दोन्ही गावांचा रहदारीसाठी तात्पुरता संपर्क तुटला. बळवली, दूरशेत, वळक या तिन्ही गावच्या रस्त्यावर पुराचे पाणी आल्याने रहदारीचा रस्ता तात्पुरता बंद करण्यात आला होता.

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या पाच तालुक्यातील शाळा आणि महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले होते. अलिबाग, रोहा, तळा, महाड पोलादपूर या तालुक्यातील शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती.

### भाजप जनतेला दिलेला शब्द पूर्ण करणारा पक्ष

आमदार ठाकूर आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने केवळ विकासाची आश्वासने दिली नाहीत, तर ती प्रत्यक्षात उतरवून दाखवली आहेत. विविध योजनांच्या माध्यमातून कोट्यवधी भारतीयांच्या जीवनात सकारात्मक बदल घडला असून हे सरकार केवळ बोलणारे नव्हे, तर संकल्पांना कृतीत उतरवणारे सरकार आहे.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## तळा तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात १८ जून रोजी मुसळधार पावसाला सुरुवात झाली व रात्री मोठ्या प्रमाणात वादळ वाऱ्यांसह पावसाने झोडपल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे.

तालुक्यात पडलेल्या पावसाने नद्या, नाले तुडुंब भरून वाहण्यास लागले असून काही ठिकाणी रस्त्यावर पाणी आल्याच्या घटना घडल्या आहेत.त्याच बरोबर काही ठिकाणी झाडेही पडली आहेत.हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार मुसळधार पाऊस पडत असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आल्याने नागरिक घरातून बाहेर पडले नाहीत . बाजारपेठेतही शुकशुकाट पहावयास मिळाला आज तळे येथे १०६ मि.मी पाऊस पडला आहे.



# साथीचे आजार टाळण्यासाठी काळजी घ्या

## पावसाळ्याच्या अनुषंगाने पनवेल महापालिकेचे आवाहन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे. वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत घ्यावयाच्या खबरदारी विषयी जनजागृती विविध माध्यमांतून करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करून नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.

पावसाळ्यामध्ये अनेकवेळा दूषित पाण्यामुळे कॉलरा, गॅस्ट्रो, विषमज्वर असे जलजन्य रोग होण्याची भिती असते त्यामुळे नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. तसेच भाज्या, फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी, डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षार संजिवनी मिश्रणाचा वापर करावा. घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी घरातील फुलदाणी मनीप्लँट, वॉटरकूलर इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक वेळा पुर्णपणे काढून कोरडे करून कोरडा दिवस पाळावा, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

ज्या ठिकाणी स्वच्छता पाळली जात नाही अशा हॉटेल्स, खानावळी इतर ठिकाणी खाणे, पाणी पिणे टाळावे, बाहेरील बर्फ खाणे टाळावे.

ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणे असल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा. तसेच हिवताप, डेंगू, मेंदूज्वर, चिकनगुनिया, मलेरिया असे साथीचे रूग्ण आपल्या आसपास आढल्यास जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी किंवा रूग्णालयाशी संपर्क साधावा. रूग्णालयांनी, प्रयोगशाळांनी साथीच्या रोगाचे रूग्ण महापालिकेला idsppanvelcorporation@gmail.com या ईमेलआयडीवरती कळवावे, असे आवाहन वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांकडून सूचना फलक



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत वर्षा सहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन हद्दीत असलेल्या विविध ठिकाणच्या नदी पात्रे, धरणे, कुंडे आधी ठिकाणी सूचना फलक उभारण्यात आले आहेत.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हद्दीत सूचना फलक उभारण्यात आले असून या पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील पर्यटनाचे ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना सुरक्षेचे दृष्टीकोनातुन विविध सुचना देण्यात आल्या आहेत त्यामध्ये पर्यटकांनी नदी पात्रात जाणे हे त्यांचे जिवीतास धोकादायक आहे, नदी पात्रामध्ये बऱ्याच ठिकाणी मोठे व खोल डोह असल्याने ते समजुन येत नाहीत. आपण आलेले परिसरात पाऊस नसला तरी, माथेरान येथे पाऊस झाल्यास पाण्याचे प्रवाहामध्ये अचानक पणे मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने व ते लगेच समजुन येत नसल्याने काही लोकांचा यापुर्वी सदर नदीपात्रात बुडून मृत्यू होवुन बऱ्याच दुर्घटना झालेल्या आहेत त्यामुळे पर्यटकांनी त्याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

लहान मुले, स्त्रीया व ज्या लोकांना पोहता येत नाही. अशा लोकांनी पाण्यात उतरू नये. गाढेश्वर धरणातून पनवेल शहरास पिण्याचे पाण्याचा पुरवठा होत असतो त्यामुळे नदीपात्रात उतरून अगर कोणतेही पदार्थ अथवा वस्तु टाकून पाणी दुषित करू नये. परिसरात अंमली पदार्थ, मद्य/दारू अथवा तत्सम मादक द्रव्य आणण्यास व पिण्यास मनाई आहे. या परिसरात अंमली पदार्थ, मद्य/दारू अथवा तत्सम मादक द्रव्य अथवा पदार्थ बाळगताना अगर पिताना कोणी आढळल्यास संबधिताविरूध्द प्रचलित कायद्यान्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदरचा परिसर हा घनदाट झाडा-झुडपांचा व डोंगराळ असुन तेथील रस्ते अरूंद आहेत. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास अग्निशमन वाहने, ॲम्ब्युलन्स यांना जाण्या येण्यासाठी रस्ता खुला रहावा यासाठी रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा तऱ्हेने रस्त्याचे कडेला, दुतर्फा चारचाकी व दुचाकी वाहने उभी करू नयेत, रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा तऱ्हेने उभे करण्यात आलेले वाहन चालकावर मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

पावसाळी पर्यटकांना गाढेश्वर धरण, वारदोली धबधबा, मोर्बे धरण, कुंडी धबधबा (अर्पिता फार्म हाऊस जवळील धबधबा) हरिग्राम नदीपात्र, धोदाणी नदीपात्र, चिंध्रण व मोहोदर नदीपात्र, शांतीवन, नदीपात्र, माची प्रबळ या ठिकाणी भेटी देण्यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, वरीलप्रमाणे कृती करताना कोणी आढळुन आल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे संपर्क ९८१९६७९१०० तसेच डायल ११२ या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधुन माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कामोठ्यात नालेसफाई न झाल्याने ठेकेदाराची चौकशी करण्याची मागणी

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील नालेसफाई न झाल्याने ठेकेदाराची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी माजी नगरसेवक अरुणकुमार भगत यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पनवेल आयुक्तांना निवेदन दिले आहे.

अरुणकुमार भगत यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे प्रभागामध्ये विविध ठिकाणी नाले रस्त्यावर भरुन वहात आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असून मान्सुनपुर्व नालेसफाई होणे आवश्यक होते, परंतु नालेसफाई करणाऱ्या ठेकेदाराने मात्र काही विभागात काम केलेले नाही. सदरील ठेकेदाराला वारंवार या परिसरातील स्वच्छता निरीक्षक यांनी नालेसफाई बाबत कळवून देखील त्याने कोणतेही काम केले नाही. या ठेकेदाराकडे पुरेसे मनुष्यबळ, यंत्रसामग्री उपलब्ध नसल्याने त्याच्याकडून कोणतेही काम न झाल्याचे दिसून येत आहे. या ठेकेदाराची कामोठे शहरामध्ये नालेसफाई न केल्याबाबत पुर्ण चौकशी करावी व त्याच्यावर नियमानुसार कारवाई करावी.

## प्रजापती संस्थेतर्फे रविवारी विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ रजि. दरवर्षीप्रमाणे, या वर्षीही राष्ट्रीय सामाजिक संघटना (एनजीओ) येत्या रविवार, २२ जून रोजी नर्मदा कॉम्प्लेक्स को-ओ. हा. येथे दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करणार आहे आणि गरजू विद्यार्थ्यांना मोफत नोटबुक आणि अभ्यास साहित्य वाटणार आहे.

हे सोसायटी हॉल, प्लॉट क्रमांक ३९६, बस स्टँड- पनवेल स्टेशन रोड, पनवेल येथे सकाळी ११ वाजता आयोजित केले जाईल. हा उपक्रम गेल्या २१ वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे. संस्थेने सोसायटीच्या सदस्यांना विनंती केली आहे की त्यांनी मोठ्या संख्येने विद्यार्थी/मुलांना सोबत घेऊन याचा लाभ घ्यावा आणि कार्यक्रम यशस्वी करावा. अधिकमाहितीसाठी ९८६९४५४२५२/९१६७०८८८७३ या क्रमांकावर संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तीन वाहनांच्या काचा तोडून वस्तू चोरल्या

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहतीमधील तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये वाहनांच्या काचा फोडून चोरट्यांनी त्यामधून तब्बल एक लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरल्याचे समोर आले आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

खारघरमध्ये चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ आहे. वाहनांच्या काचा फोडून चोरी करण्याच्या घटना दिवसभरात घडल्या. त्यात सेक्टर १२ येथील सातारा को-ऑप. सोसायटी, प्राइम मॉलच्या समोर आणि तिसरी घटना पोलीस ठाण्यापासून हाकेच्या सेक्टर ७ येथील क्रोमा अंतरावर दुकानासमोर घडली. या तीनही घटनांमध्ये लॅपटॉप, आयपॅड, नोटबुक लॅपटॉप असे विविध वस्तू चोरीस गेल्या आहेत.

## गव्हाण विद्यालयात शारीरिक व मानसिक आरोग्य विषयावर समुपदेशन कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयात व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये अनिवासी गुरुकुल प्रकल्पांतर्गत जी.डी.पोळ फाऊंडेशन व केरला मेडिकल ट्रस्ट वैद्यकीय महाविद्यालय, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'ऑटिस्टिक प्राईड डे'चे औचित्य साधून 'विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य' या विषयावरील समुपदेशन कार्यशाळा आयोजित करून जनजागृती करण्यात आली.

या वेळी डॉ.सोनाली सावंत यांनी विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य या विषयावर कृतीयुक्त व्याख्यान देऊन विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी अवगत करण्याविषयीचे समुपदेशन केले. या वेळी त्यांच्यासोबत डॉ.नमिता आणि डॉ.वैभवी तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, गुरूकुल प्रमुख संदीप भोईर, उपशिक्षिका सारिका ठाकूर आदी उपस्थित होते.

उपस्थित सर्व डॉक्टरांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. १८ जून हा दिवस ऑटिस्टिक प्राईड डे म्हणून साजरा केला जातो. डॉ. सोनाली सावंत यांनी विद्यार्थ्यांचे शारीरिक मानसिक आरोग्य चांगले राहावे यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी स्वच्छते विषयीच्या सूचना विद्यार्थ्यांना दिल्या तसेच आपण सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छतेचे नियम पाळत असतो. विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढावी यासाठी प्राण साधना आणि ओम साधना हे योगाचे प्रकारसुद्धा विद्यार्थ्यांकडून करून घेतले.

विद्यार्थ्यांनी समाजात वावरत असताना विशेष गरजाधिष्टीत अशा मुलांना दुर्लक्षित न करता त्यांना चांगल्या प्रकारची वागणूक देऊन त्यांना आपल्यासोबत समाविष्ट करून घ्यावे तसेच त्यांच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात, असे आवाहन केले. काही विद्यार्थी कला, क्रीडा यांसारख्या विषयात निपुण असतात. त्यांनाही आपल्यासारखीच वागणूक देऊन समाजात त्यांना चांगले स्थान मिळाले पाहिजे, अशी आशा डॉ. सावंत यांनी व्यक्त केली.

हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यालयातील उपशिक्षिका ठाकूर एस. एस. व त्यांचे चिरंजीव कुमार सिद्धांत ठाकूर यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी भोईर एस.के.यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# कळंबोलीत रिक्षा स्टँडचे उद्घाटन

## रवी नाईक यांच्या वाढदिवसाचे औचित्य



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

रिक्षा चालकांचे प्रश्न सोडण्यासाठी नेहमीच काम करत राहणार असल्याचे प्रतिपादन वंदे मातरम जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक यांनी रिक्षा स्टॅंडच्या उद्घाटनावेळी केले. वंदे मातरम जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक यांचा वाढदिवस बुधवारी (दि.१८) साजरा झाला. यानिमित्त कळंबोलीमध्ये संघटनेच्या ५८व्या रिक्षा स्टँडचा उद्घाटन सोहळा आयोजीत करण्यात आला होता.

या वेळी कळंबोली शहर मंडळ अध्यक्ष अमर पाटील व मंडळाचे माजी अध्यक्ष रविनाथ पाटील यांच्या उपस्थितीत रिक्षा स्टँडचे उद्घाटन झाले.

या कार्यक्रमाला माजी नगरसेवक बबन मुकादम, मोतीलाल कोळी, पांडुरंग पाटील, रवींद्र कुरडूस, सल्लागार सिद्धेश बनकर, कलंबोली रिक्षा स्टँण्डचे अध्यक्ष संतोष कोकणे, उपाध्यक्ष सागर घाडगे, सेक्रेटरी हनुमंत गायकवाड, खजिनदार पोपट फडतरे, केशव यादव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# कामोठ्यात विकसित भारत संकल्प सभा



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष कामोठे शहर मंडळातर्फे विकसित भारत संकल्प सभा बुधवारी (दि.१८) आयोजीत केली होती. या सभेत भारतीय जनता पक्षाचे कर्जत मंडळ अध्यक्ष राजेश भगत यांनी मार्गदर्शन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ११ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानिमित्त देशाच्या विकासासाठी घेतलेल्या संकल्पांना जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेमध्ये केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा विकास प्रकल्प आणि भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी आखलेल्या धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामोठे शहर अध्यक्ष विकास घरत, ओबीसी मोर्चाचे राजेश गायकर, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, प्रदीप भगत, अशोक पाटील, मयूर मोहिते, माजी अध्यक्ष रवींद्र जोशी, हर्षवर्धन पाटील आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेल येथे आदर्श सरपंचांचा पुरस्काराने सन्मान

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येत्या सप्टेंबरपासून राज्यभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मुख्यमंत्री समृद्ध ग्रामयोजना ही स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत राज्यात प्रथम येणाऱ्या गावाला पाच कोटीचे बक्षीस दिले जाणार असल्याची घोषणा राज्याचे ग्रामविकास, पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी बुधवारी (दि.१८) पनवेल येथे केली. दै. पुढारीतर्फे पनवेल येथे ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यातील जणांचा आदर्श सरपंच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला राज्याचे रोजगार हमी आणि खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, कोकण विभागीय अतिरिक्त आयुक्त माणिकराव दिवे रायगड जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पनवेल महापालिकेचे उपायुक्त वैभव विधाते, उपस्थित होते. या कार्यक्रमात दै. पुढारीतर्फे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

या वेळी मंत्री भरत गोगावले यांनी केंद्र, राज्य सरकारच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी अनेक योजना राबविण्यात येते असून, रोजगार हमी योजनाची प्रभाविपणे अंमलबजावणी करून सरपंच यांनी गावाचा विकास साधावा, असे आवाहन केले. दै. पुढारी आयोजित आदर्श सरपंच सन्मान सोहळा बुधवारी पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता. या वेळी रायगडसह ठाणे, पालघर जिल्ह्यातील आदर्श सरपंच आणि लोकप्रतिनिधींचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कोकणातील आदर्श सरपंचांचा सन्मान आणि आदर्श गाव बनवू या अशी मोहिम दै. पुढारीने हाती घेतली असून या मोहिमेचा शुभारंभ आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ग्रामविकास, पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे आणि रोजगार हमी, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या सोहळ्यात आदर्श सरपंचांचा सन्मान करण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनीही आपल्या भाषणातून सरपंच हा ग्रामविकास प्रक्रियेतील महत्वाचा घटक असल्याचे नमूद केले. आज अनेक गावातील सरपंचांनी सरकारी योजना प्रभाविपणे राबवून विकास साधला आहे. आता आधुनिक तंत्रज्ञानाचाही विनियोग गावाच्या विकासासाठी करून घेतला जात आहे हे निश्चित अभिमानास्पद असेच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेहमीच आव्हाने ही संधी समजून कामे करा, असा सल्ला देत आलेले आहेत. त्यानुसार सरपंच यांनीही ग्राम विकास हे आव्हान समजून चांगले कार्य करावे आणि विकासाची घोडदौड सुरू ठेवावी, असे आवाहन केले.

## प्रधानमंत्री आवास योजना विभागांतर्गत लाभार्थीची नोंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका तर्फे प्रधानमंत्री आवास योजना विभाग अंतर्गत लाभार्थीची नोंद करण्याचे अभियान जोरदारपणे सुरू आहे.

पनवेल महानगरपालिका तर्फे प्रधानमंत्री आवास योजना विभाग अंतर्गत पनवेल हद्दीतील नागरिकांचे डिमांड सर्वेक्षण चालू आहे. पनवेल मनपाकडून जो कौतुकास्पद उपक्रम राबविला गेला. यात कुष्ट पीडित यांच्याकरिता मनपामार्फत करण्यात आलेल्या पिमे युनिफाईड पोर्टलवर लोकमान्य वसाहत मधील पत्र लाभार्थीची नोंद करण्यात आली.

या ठिकाणी ॲड. मनोज भुजबळ प्रधानमंत्री आवास योजनेचे कर्मचारी चंद्रशेखर मोरे, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी करण भालेकर, समाजसेवक अशोक आंबेकर उपस्थित होते.



## संपादकीय

# मैत्री की निव्वळ मतलब?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधताना, भारत-पाकिस्तान संबंधांच्या संदर्भात भारताने कोणत्याही तिसऱ्या पक्षाच्या मध्यस्थीला मान्यता दिलेली नाही आणि भविष्यातही देणार नाही हे स्पष्ट केले असले तरी ट्रम्प यांनी त्यानंतरही आपणच मध्यस्थी करून युद्ध थांबवल्याचा हेका कायम ठेवला आहे. सध्या इस्त्रायल-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर ते पाकिस्तानला चुचकारत असल्याचेही म्हटले जाते आहे.

**ऑपरेशन सिंदूरनंतर प्रथमच बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवरून ३५ मिनिटे संवाद साधला. भारत आणि पाकिस्तान यांच्या संघर्षामध्ये वा दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये तिसऱ्या राष्ट्राची मध्यस्थी भारताने कधी मान्य केली नव्हती व यापुढेही मान्य केली जाणार नाही असे मोदी यांनी ट्रम्प यांना यावेळी ठोस शब्दांत स्पष्ट केल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी प्रसारमाध्यमांना दिली. जी-७ शिखर परिषदेच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी यांची ट्रम्प यांच्याशी भेट होणार होती. पण ट्रम्प यांना इस्त्रायल-इराण संघर्षामुळे १७ जूनला शिखर परिषद मध्येच सोडून अमेरिकेला परतावे लागल्याने ही भेट होऊ शकली नाही. त्यानंतर ट्रम्प यांनी मोदी यांना कॅनडाहून परतताना अमेरिकेला येण्याचे निमंत्रण दिले होते. परंतु मोदी यांचा भारतात परतताना क्रोएशियाचा दौरा ठरलेला असल्यामुळे त्यांना ट्रम्प यांचे निमंत्रण नाकारावे लागले. यानंतर ट्रम्प यांच्या विनंतीवरून दोन्ही नेत्यांमध्ये दूरध्वनीवरून संवाद झाला. यापूर्वी २२ एप्रिल रोजी ट्रम्प यांनी मोदी यांना दूरध्वनी करून पहलगाम हल्ल्याबद्दल सहवेदना व्यक्त केल्या होत्या. ऑपरेशन सिंदूरदरम्यान अमेरिकेशी कुठलीही व्यापारविषयक चर्चा झाली नाही. पाकिस्तानबरोबरचा संघर्ष थांबवण्याबाबतही अमेरिकेशी मध्यस्थीसंदर्भात कोणतीही चर्चा झाली नाही. पाकिस्तानविषयक धोरणाबाबत भारतात राजकीय एकमत आहे असे मोदींनी ट्रम्प यांच्याशी झालेल्या संभाषणादरम्यान अधोरेखित केले. पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान दरम्यान सुरू झालेला युद्धसदृश संघर्ष आपण मध्यस्थी करून थांबवल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी १० मे रोजी युद्धविरामाची घोषणा करत पहिल्यांदा केला. तेव्हापासून किमान तेरा वेळा त्यांनी या मध्यस्थीचा पुनरुच्चार केला आहे. इतकेच काय, मोदी आणि ट्रम्प यांच्यातील दूरध्वनी संभाषणाला काही तास उलटल्यानंतर वॉशिंग्टन येथे पत्रकारांशी बोलतानाही ट्रम्प यांनी पुन्हा आपल्या त्याच दाव्याचा पुनरुच्चार केला. मी युद्ध थांबवले. मोदी हे चांगली व्यक्ती आहेत. आम्ही लवकरच व्यापार करार करू, असे ट्रम्प म्हणाले. त्याचवेळी, भारत-पाकिस्तान युद्ध थांबवण्यासाठी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी पुढाकार घेतल्याचेही ट्रम्प यांनी सांगितले. ट्रम्प आणि मोदी यांची भेट न होण्यावरून तसेच संभाषणाच्या तपशीलांवरून दोघांमधील संबंध पूर्वीप्रमाणे उरलेले नाहीत असे मत राजकीय क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केले आहे. पण पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे मोदींनी अमेरिकेत थांबण्यास असमर्थता दर्शवली असे मिस्त्री यांनी सांगितले. दोन्ही नेते लवकरच पुन्हा भेटण्याचा प्रयत्न करतील असेही सांगण्यात आले आहे. इस्त्रायल-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे लक्ष पाकिस्तानच्या भौगोलिक उपयुक्ततेकडे आहे. त्यामुळेच ट्रम्प सध्या पाकिस्तानला चुचकारत असल्याचे सांगितले जाते. यामुळेच पाकिस्तानचे लष्करप्रमुख मुनीर यांच्यासाठी ट्रम्प यांनी व्हाइट हाऊसमध्ये मेजवानी आयोजित केली. अर्थात ट्रम्प वेळोवेळी मोदी यांच्याविषयीही प्रेमादरानेच बोलतात. आंतरराष्ट्रीय संबंधांत अमेरिका निव्वळ आपला मतलब साधू पाहात असते असे म्हटले जाते ते बहुदा यामुळेच.**

# अलिबागची हद्द वाढ व्हायला हवी

खबरबात
प्रकाश सोनवडेकर

रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग नगरपालिकेचे क्षेत्र तुलनेत खूपच कमी आहे. त्याचे दुष्परिणाम या शहराला भोगावे लागत आहेत. त्यासाठी अलिबाग शहराची हद्द वाढ व्हायला हवी. शहराच्या शेजारील चेंढरे, वरसोली, वेश्वी आणि कुरूळ या ग्रामपंचायतींचा समावेश अलिबाग नगरपरिषदेत केला पाहिजे. यात राजकारण न करता भविष्याचा विचार करून निर्णय घ्याला हवा.



अलिबाग हे सध्या पर्यटन स्थळ महणून प्रसिद्ध आहे. सुंदर समुद्रकिनारा लाभलेले हे शहर मिनी गोवा म्हणून प्रसिद्द आहे. संपूर्ण भारत देशातून लाखो पर्यटक दर वर्षी या शहराला भेट देतात. जिल्ह्यातील इतर शहरांच्या तुलनेत अलिबाग शहर स्वच्छ असते. परंतु मागील काही दिवसांमध्ये या शहरात अस्वच्छता दिसुलागली आहे. अस्वछातेबरोबरच इतरही समस्या या शहराला भेडसावत आहेत. अपुरा पाणी पुरवठा, अतिक्रमणं, बांधकाम आणि बकालीकरण यामुळे नागरी समस्यांमध्ये भर पडत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या परिसरात, सतीश इंजिनिअरिंग समोरील रस्त्यावर साठणारे पाणी हे ही एक मोठी समस्या आहे. दर पावसाळ्यात येथे पाणी साचते. परिणामी सदर परिसर ४ महिने घाणेरड्या साठलेल्या पाण्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना रस्त्याच्या मधोमध चालावे लागते. वाहतुकीवर त्यांचा परिणाम होतो. आजही या भागात पाणी साचले आहे. हे पाणी वाहून जाण्यासाठी कायमचा उपाय काढलाच पाहिजे.

एस.टी. स्टँड समोरून व्यायामशाळेत जाणाऱ्या गल्लीत भाजी विक्रेत्या महिला मोठ्या प्रमाणावर बसतात. येथे देखील घाणीचे साम्राज्य असते. सध्या मासळी बजारात जाताना नाक मुठीत धरून जावे लागते. एस.टी स्टँड ते शिवाजी पुतळा या रस्त्यात फेरीवाले बसलेले असतात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. बांधकाम होत आहेत. लोकसंख्या वाढत आहे. अलिबागची लोकसंख्या वाढत असली तरी अलिबागचे क्षेत्रफळ मात्र तेवढेच आहे. अलिबागचे क्षेत्र वाढू शकत नाही. पश्चिमेला समुद्र, दक्षिणेला खाडी, उत्तर व पूर्वेस वरसोली, चेंढरे हि गावे. त्यामुळे या शहराचा विस्तार होत नाही.


सध्या अलिबाग नगरपरिषदेच्या हद्द वाढीबाबत चर्चा सुरु आहे. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सूचना दिल्या आहेत. त्याला काही लोक विरोध करतं आहेत. हद्द वाढ हा निर्णय नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावावर आधारित असावा लागतो. नगर परिषदेची सर्वसाधारण सभा हद्दवाढीचा प्रस्ताव मंजूर करते, त्यानंतर संबंधित ग्रामपंचायतीकडे ना हरकत दाखला मागणारे अधिकृत पत्र पाठवले जाते. संपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी व राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवावा लागतो. मुख्याधिकारी यांनी कोणताही ठराव न घेता हे काम सुरु केला आहे असे यांचे मानणे आहे. तांत्रिक बाबी असतील तर त्या पूर्ण केल्याच पाहीजेत. परंतु अलिबाग नगरपरिषदेच्या हद्द वाढीला विरोध करणे उचित नाही.

अलिबाग शहराचे सद्याचे क्षेत्रफळ फारच कमी आहे. रायगड जिल्ह्यातील इतर नगर परिषदांच्या तुलनेत अलिबागचे क्षेत्रफळ सर्वात कमी आहे. जिल्ह्याची राजधानी असल्याने अलिबागेत कोर्ट, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद वगैरे सर्व शासकी विभागांची मुख्यालय आहेत. आपल्या कामासाठी रोज जिल्हाभरातून असंख्य माणसे येत असतात. अलिबागमध्ये येणाऱ्या पर्यटकांच्या संखेत वाढ झाली आहे. बांधकाम होत आहेत. लोकसंख्या वाढत आहे. त्याचा ताण अलिबाग नगर परिषदेवर पडतोय. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत.

अलिबाग नगरपरिषदेचे क्षेत्र कमी त्यात जवळपास ७५ टक्के क्षेत्र सीआरझेडमध्ये आहे. त्यामुळे नियोजनबद्ध वकास होत नाही. प्रस्तावित रेवस - करंजा पूल , अलिबाग विरार मल्टीकॅरीडॉर, कोस्टल हायवे यामुळे भविष्यात अलिबाग व आसपासच्या परिसरात झपाट्याने विकास होणार आहे. अलिबाग शहराचा सुनियोजित विकास करण्यासाठी अलिबाग नगरपरीषदेची हद्द वाढवली पाहिजे . त्यासाठी वरसोली, चेंढरे, वेश्वी, कुरूळ या ग्रामपंचायतींचा समवेश अलिबाग नगरपरिषदेत करावा लागणार आहे.

# लक्ष्मणराव किर्लोस्कर

किर्लोस्कर इंडस्ट्रीजचे संस्थापक लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा जन्म २० जून १८६९ रोजी बेळगाव जिल्ह्यातील गुरलाहोसूर या छोट्याशा गावात झाला. त्यांनी आपल्या आयुष्याची सुरुवात शाळेत शिक्षक म्हणून केली आणि नंतर बेळगावमध्ये सायकल दुरुस्तीचे दुकान उघडले. जेव्हा बेळगाव नगरपालिकेने किर्लोस्करांना त्यांची जागा रिकामी करण्याचे आदेश दिले तेव्हा लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना त्यांच्या कार्यशाळेसाठी योग्य जागा मिळाली नाही. परंतु औंधच्या शासकाने त्यांना दहा हजार रुपयांचे कर्ज देऊन जागा देऊ केल्यामुळे त्यांनी कुंडल रोड नावाच्या प्रसिद्ध रेल्वे स्थानकाच्या बाजूला पडीक जमिनीत आपला कारखाना सुरू केला. हा कारखाना नंतर प्रसिद्ध किर्लोस्कर उद्योगात विकसित झाला आणि स्टेशनला किर्लोस्करवाडी असे नाव पडले. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी ३२ एकर ओसाड जमिनीवर पाऊल ठेवले, जिथे कॅक्टस पसरलेले होते आणि नागांनी भरलेले होते.



मानवी क्षमतेवरील त्यांच्या श्रद्धेने प्रेरित होऊन, लक्ष्मणरावांनी २५ कामगार आणि त्यांच्या कुटुंबांना एकत्र केले आणि त्या ओसाड जागेचे त्यांच्या स्वप्नातील गावात रूपांतर करण्यात यश मिळवले. लक्ष्मणरावांचा मानवावरील विश्वास इतका होता की, तुकाराम रामोशी आणि पिर्या मांग, दोघेही दोषी दरोडेखोर, किर्लोस्करवाडीचे विश्वासू रक्षक बनले! अंधश्रद्धाळू शेतकऱ्यांना पटवणे अत्यंत कठीण होते आणि लक्ष्मणराव किर्लोस्करांना त्यांचा पहिला लोखंडी नांगर विकण्यासाठी दोन वर्षे लागली .त्यांचे स्वप्न होते की त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतःचा उद्योग आणि समुदाय बांधावा; त्यांनी हे स्वप्न किर्लोस्करवाडी येथे साकार केले, जिथे त्यांनी १९१० मध्ये किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड कारखाना सुरू केला.पर्यावरणाची आणि वास्तवाची समज असणे हे अभूतपूर्व औद्योगिक अवजारांच्या निर्मितीसाठी आवश्यक आहे. या दृढ विश्वासातून लोखंडी नांगराचा जन्म झाला, जो किर्लोस्करांचे पहिले उत्पादन होते. .पारंपरिक शेती करणार्या महाराष्ट्रातील शेतकर्यांना यंत्रांचा वापर शेतीमध्ये करण्यास सांगणे हे मोठे अवघड काम होते. शंतनुरावांनी केवळ यंत्रांचे उत्पादनच केले असे नाही, तर त्यांनी 'उत्पादन वाढवणार्या यांत्रिक, आधुनिक शेतीचा प्रसार' केला. अशा या महान उद्योगमहर्षीचे २४ एप्रिल १९९४ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# ॲमेझॉनच्या पार्सल सुरक्षिततेत वाढ

आजच्या धकाधकीच्या जीवनात लोकांचे अन्न वस्त्र निवारा बरोबरच मोबाईल ही सुद्धा जीवनावश्यक गरज बनली आहे आणि त्यातच ऑनलाइन शॉपिंगची क्रेझ झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे त्याच्याशी संबंधित समस्या देखील वेगाने वाढल्या आहेत. डिलिव्हरीमध्ये छेडछाड आणि चुकीचे उत्पादन मिळाल्याच्या अनेक तक्रारी सध्या ग्राहकांमध्ये वाढत आहेत. पॅकेज छेडछाडी टाळण्यासाठी ई-कॉमर्स कंपनी अमेझॉनने आता एक मोठे पाऊल उचलले आहे. अमेझॉन सतत त्यांच्या पॅकेजिंग प्रणालीमध्ये सुधारणा करत आहे. याचा सर्वात मोठा फायदा असा की ग्राहकाला त्याच्या ऑर्डरमध्ये काही समस्या आहे की नाही हे लगेच कळणार आहे. हे पाऊल अमेझॉनसाठी गेम चेंजर ठरू शकते. त्यामुळे जर तुम्ही देखील ऍमेझॉनवरून ऑनलाइन खरेदी करत असाल आणि तुमच्या महागड्या ऑर्डरमध्ये छेडछाड होण्याची चिंता सतावत असेल तर आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. कारण अमेझॉनने आता एक मोठे पाऊल उचलेले आहे. ज्यामध्ये त्यांच्या पार्सलच्या सुरक्षिततेसाठी एक नवीन स्मार्ट तंत्रज्ञान सादर केले आहे, ज्यामुळे कोणतीही छेडछाड त्वरित लक्षात येणार आहे.अमेझॉनने आपली पॅकेजिंग प्रणाली अधिक सुरक्षित आणि विश्वसनीय करण्यासाठी छेडछाड प्रतिरोधक तंत्रज्ञान बाजारात आणले आहे. या नवीन तंत्रज्ञानाअंतर्गत पॅकेजेसमध्ये विशेष सीलिंग टेप वापरली जाणार आहे . याद्वारे ग्राहकाला त्याच्या ऑर्डरमध्ये काही समस्या आहे की नाही हे लगेच कळेल.ही विशेष सीलिंग टेप आहे , ज्यावर लहान गुलाबी आणि लाल ठिपके आहे.ही टेप पॅकेजेसला सुरक्षित ठेवण्यास मदत करते. जेव्हा एखादी व्यक्ती सील गरम करून उघडण्याचा प्रयत्न करते तेव्हा हे ठिपके त्यांचा रंग बदलतात. यावरून स्पष्ट होते की पॅकेजमध्ये छेडछाड झाली आहे. असा प्रकार जर झाला तर सर्वप्रथम पार्सलचा फोटो किंवा व्हिडिओ काढून ठेवा. कारण हा पुरावा म्हणून वापरला जाऊ शकतो.याशिवाय जर गुलाबी ठिपका स्पष्ट दिसत असेल तर पार्सल घेण्यास नकार द्या.ताबडतोब ग्राहक सेवेशी संपर्क साधा आणि तक्रार नोंदवा.अमेझॉनच्या मते, जर कोणत्याही पॅकेजमध्ये असा ठिपका दिसला तर ग्राहकांनी ते पार्सल स्वीकारू नये.




# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

## निमित्त

एमएसईबी हे भारतातील महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेले राज्य सरकारचे विद्युत नियमन मंडळ आहे. MSEBची स्थापना २० जून १९६० रोजी विद्युत (पुरवठा) अधिनियम, १९४८च्या कलम अंतर्गत करण्यात आली. १९९८मध्ये ही राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळानंतर भारतातील दुसरी सर्वात मोठी वीज निर्मिती युटिलिटी होती.




कंपनीचे पूर्ववर्ती बॉम्बे इलेक्ट्रिसिटी बोर्ड होते जे ६ नोव्हेंबर १९५४ रोजी स्थापन झाले आणि ३१ मार्च १९५७पर्यंत कार्यरत होते जेव्हा त्याचे नाव बदलून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ असे करण्यात आले जे १९ जून १९६०पर्यंत कार्यरत होते. एमएसईबी आणि एनरॉन यांच्यातील सहकार्याचा परिणाम होता.

भारत सरकारच्या विद्युत कायदा २००३नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची २००५मध्ये चार कंपन्यांमध्ये पुनर्रचना करण्यात आली.

महावितरण महानिर्मिती पॉवर प्लांट किंवा इतर राज्य वीज मंडळे आणि खाजगी क्षेत्रातील वीज निर्मिती कंपन्यांकडून वीज खरेदी करून राज्यभर वीज वितरणासाठी जबाबदार आहे. एमएसईबी होल्डिंग कंपनी लिमिटेड या होल्डिंग कंपनीची इतर तीन कंपन्यांमधील सर्व हिस्सेदारी आहे. या तीनही कंपन्यांमध्ये अभियंत्यांचे वर्चस्व आहे.

भारतातील एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमतेपैकी १३ टक्के महाराष्ट्राचा वाटा आहे, जी मुख्यत्वे कोळसा आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांचा वापर करून अपारंपरिक संसाधनांपासून तयार केली जाते. वीज उत्पादनासाठी मंडळाची सात जलविद्युत व १० औष्णिक (यांत एक गॅस टरबाइन आहे) केंद्रे आहेत व त्यांनी १९८१-८२मध्ये एकूण उत्पादनापैकी ८२ एमएसईबी टक्के उत्पादन केले होते. याशिवाय लागणारी वीज, मंडळाने टाटांकडून १० टक्के, अणुशक्ती केंद्राकडून पाच टक्के व कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात या राज्यांच्या वीज मंडळाकडून प्रत्येकी एक टक्के अशी विकत घेतली. मंडळाचे सर्वांत मोठे जलविद्युत केंद्र कोयना धरणावर असून त्याची स्थापित क्षमता (तिन्ही टप्पे) आठ लक्ष कि.व्हॅ. आहे. सर्वांत मोठे औष्णिक केंद्र कोराडी (तिन्ही टप्पे) येथे आहे.

मंडळाने १९८१-८२मध्ये पुरविलेल्या विजेपैकी ५६ टक्के उद्योगधंद्यांना, १३ टक्के घरगुती वापरासाठी, शेतीला १२ टक्के आणि उरलेली १९ टक्के व्यापार, सार्वजनिक प्रकाश, इतर किरकोळ बाबी यांसाठी वापरली होती. मंडळाचे व्यवस्थापन शासननियुक्त अध्यक्ष व सात सदस्यांचे संचालक मंडळ यांच्याकडे आहे, तसेच मंडळाची १५ सदस्यांची सल्लागार समिती असून त्यात वीजपुरवठा उद्योग, वीज उपभोक्ते , व्यापार व उद्योग, वाहतूक, कामगारवर्ग व लोकहितार्थ शासननियुक्त सदस्य आहेत.

मंडळाला वित्तपुरवठा बहुतांशाने शासनाकडून कर्जरुपाने होतो, तसेच मंडळ कर्जरोख्यांद्वारे व इतर पद्धतींच्या कर्जाद्वारे भांडवल गोळा करू वा उभारू शकते. सध्या वीजपुरवठ्याची मागणी वाढत असून त्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. (साभार : विकीपीडिया)


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# निरोगी त्वचेचे रहस्य जाणून घ्या...

तेजस्वी, निरोगी त्वचा असणे ही प्रत्येकाचीच इच्छा असते. आणि निरोगी त्वचा आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य दोन्ही वाढवते त्वचेची काळजी घेण्यासाठी आपल्या जीवन शैली मध्ये आहे. आहारामध्ये योग्य तो समतोल राखणे आवश्यक आहे.बाजारातील नवनवीन प्रॉडक्ट्सने त्वचा केवळ खराबच होत नाही तर त्वचेची खूप हानी होते बऱ्याच वेळा त्याचा आपल्या आरोग्यावर ही परिणाम होतो त्यामुळे आपल्या त्वचेला योग्य प्रकारे निरोगी ठेवले पाहिजे.



१) दररोज सकाळी आणि संध्याकाळी अशी दोनदा तुमची त्वचा स्वच्छ करा, जेणेकरून छिद्रे आणि मुरुमे यासारख्या त्वचेच्या समस्या होणार नाहीत
२)आत आणि बाहेर त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी दिवसभर भरपूर पाणी प्या. याव्यतिरिक्त, तुमच्या त्वचेच्या प्रकारासाठी योग्य असलेले मॉइश्चरायझर वापरा जेणेकरून ओलावा टिकून राहील आणि कोरडेपणा टाळता येईल
३)अकाली वृद्धत्व रोखण्यासाठी आणि त्वचेच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांपासून तुमच्या त्वचेचे संरक्षण करणे आवश्यक आहे. दररोज, SPF ३० सनस्क्रीन लावा
४)त्वचेच्या आरोग्यात पोषणाची भूमिका महत्त्वाची असते. त्वचेच्या आरोग्याला आधार देणारे आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स मिळण्यासाठी तुमच्या आहारात विविध फळे, भाज्या, पातळ प्रथिने आणि निरोगी चरबी समाविष्ट करा.
५) त्वचेला पुन्हा निर्माण होण्यासाठी दररोज पुरेशी झोप घ्या.
६) दीर्घकालीन ताण तुमच्या त्वचेवर परिणाम करू शकतो, ज्यामुळे पुरळ, जळजळ आणि अकाली वृद्धत्व येऊ शकते. ताण कमी करण्यासाठी आणि एकूणच आरोग्य सुधारण्यासाठी योग सारख्या प्रणालीचा वापर करा
७) धूम्रपानामुळे वृद्धत्वाची प्रक्रिया वेगवान होते आणि त्वचेच्या अनेक समस्या उद्भवू शकतात, ज्यामध्ये अकाली सुरकुत्या, निस्तेजपणा आणि असमान त्वचा रंग यांचा समावेश होतो. धूम्रपान सोडल्याने तरुण आणि चमकदार रंग मिळतो. आपल्याला सूर्य, थंडी, जंतू आणि हानिकारक पदार्थांपासून आपली त्वचा संरक्षण करत असते. सतत काळजी आणि लक्ष देऊन, तुम्ही निरोगी, चमकदार त्वचा मिळवू शकता. आवश्यकतेनुसार दिनचर्या व आहार यांचा समतोल राखा.

# रायगड जिल्ह्यासाठी आलेल्या शववाहिन्या धूळखात



**अलिबाग : प्रतिनिधी**

शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने कोट्यवधी रुपये खुर्चन रायगड जिल्ह्यासाठी शववाहिन्या खरेदी केल्या. मात्र रायगड जिल्ह्यासाठी आलेल्या या शववाहिन्या सध्या जिल्हा परिषदेच्या कुंटेबागच्या आवारात मागील महिनाभरापासून पडून आहेत. तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी केंद्र सरकारकडे महाराष्ट्र राज्यासाठी शववाहिका द्याव्यात, या मागणीचे पत्र पाठविले होते. त्याकरीता केंद्र सरकारने ३५ कोटींचा निधी मंजूर केला होता. राज्य सरकारने आयशर कंपनीला शववाहिन्यांचे कंत्राट दिले होते. त्यानुसार आयशर कंपनीने १०० अत्याधुनिक शववाहिन्या तयार करून राज्य सरकारकडे सुपुर्द केल्या होत्या.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडून पाच शववाहिन्या रायगड जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत. मात्र, त्याच्याबाबत आवश्यक असणाऱ्या मार्गदर्शक तत्वे अजून प्राप्त झालेली नाहीत. शासनाकडून मार्गदर्शक तत्व आल्यानंतर शववाहिन्या याचे वाटप करण्यात येणार असल्याचे सांगितले जाते.शववाहिन्या दाखल झाल्यापासून जिल्हा परिषदेच्या आवारात धुळखात पडून आहेत. या वाहनांच्या चाकांची हवा गेली आहे. तसेच बॅटरीही डाऊन झाली आहे.

**शासनाकडून शववाहिन्या प्राप्त झाल्या आहेत, मात्र त्यांचे वितरण झालेले नाही. त्यांच्या वापराबाबत अद्याप मार्गदर्शक तत्वे सुचना प्राप्त नाहीत. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वितरणाची तयारी करण्यात आली असून लवकरच त्या वितरीत होतील.**
**-डॉ. दयानंद सुर्यवंशी, जिल्हा आरोग्य अधिकारी**

# माणगावचा प्रलंबित विकास आराखडा अखेर मंजूर

**माणगाव: बातमीदार, प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला विकास आराखडा अखेर शासनाने मंजूर केला असल्याचे नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांनी सांगितले.यावेळी सर्व शिवसेना शिंदे गटाचे सभापती व नगरसेवक उपस्थित होते.

नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांनी सांगितले कि, माणगांवच्या विकासासाठी हा आराखडा अत्यंत महत्वाचा आहे. अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या आराखड्याच्या मंजुरीसाठी आम्ही सर्वांनी शिवसेना नेते ॲड.राजीव राजीव साबळे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला आणि आज त्याचे सकारात्मक फलित आपल्यासमोर दिसत आहे.

नुकतेच सीबीएसई शाळेच्या उद्घाटन समारंभात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माणगांवला आले असता त्यांचे कडे सोमवार दि.९ जून रोजी



विकास आराखडा मंजुरी बाबत मागणी केली होती आणि ती दहा दिवसातच १८ जूनला पूर्ण झाल्याने माणगांवकरांचे वतिने त्यांचे विशेष आभार शर्मिला सुर्वे यांनी व्यक्त केले तसेच मंत्री भरतशेठ गोगावले यांचेही विशेष सहकार्याचा खास उल्लेख करीत खासदार सुनिल तटकरे, मंत्री आदितीताई तटकरे यांचे देखील सहकार्य लाभल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पाणीपुरवठा, सामाजिक न्याय व शिक्षण समिती सभापती कपिल गायकवाड यांनी बोलताना स्पष्ट केले कि, विकास आराखड्यांतर्गत रस्ते रुंदीकरण, ड्रेनेज व्यवस्था, उद्याने, सार्वजनिक आरोग्य सुविधा आणि पाणीपुरवठा प्रकल्पांचा माणगांवचे २५ वर्ष पुढील विकासात्मक दूरदृष्टीतून समावेश करण्यात आला आहे. संपूर्ण आराखडा अंमलबजावणी वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल असे त्यांनी सांगितले आहे.

यावेळी महिला, बालकल्याण व युवक कल्याण समिती सभापती नंदिनी बामगुडे, नगरसेवक सचिन बोंबले, नगरसेवक दिनेश रातवडकर, शिवसेना उबाठाचे नगरसेवक अजित तार्लेकर, स्वीकृत नगरसेवक सुनील पवार हे देखील उपस्थित होते. माणगांव नगरपंचायतीच्या विकासाचे दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण विकास आराखडय़ाच्याची माहिती देताना नगरपंचायत मधिल राष्ट्रवादीचे सर्व नगरसेवक अनुपस्थित असल्याचे दिसून आल्याने नगरपंचायतमध्ये या महत्त्वपूर्ण घटनेनंतरही या अनुपस्थिचे कारण मात्र गुलदस्त्यात असल्याचे चित्र आहे.

# पाच लाखांच्या खंडणीप्रकरणी पत्रकार आणि ज्वेलर्सला अटक


**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील साप्ताहिक जागरूक रायगडचा संपादक व राजकीय पक्षाचा कार्यकर्ता पत्रकार किशोर साळूंके त्याचा साथीदार मध्यस्थ नाकोडा ज्वेलर्स मालक किशोर कपूरचंद पोरवाल यांना पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत यांनी सापळा लावून मंगळवारी रात्री ९ वा सुमारास १ लाख ५० हजारांची खंडणी स्विकारतांना त्याचा साथीदार मध्यस्थ नाकोडा ज्वेलर्स मालक किशोर कपूरचंद पोरवाल याच्यासह जैन मंदिर शेजारी हॉटेल रामदेव येथे रंगेहाथ पकडले.खालापूर न्यायालयाने दोघांनाही २ दिवसांची पोलीस कोठडी ठोठावल काही दिवसांपासून प्रशासकिय अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक बांधकाम व्यावसाईक, व्यापारी, दुकानदार, सामाजीक संस्थांना अनधिकृत शासकिय कामे व बांधकामे याबाबत वेगवेगळ्या व्हॉटस अप ग्रुपवर व स्थानिक पत्रके काढून कायदेशिर कारवाई करण्याबाबत धमकावत होता. खोपोलीतील ज्वेलर्स व बांधकाम व्यावसाईक निरज प्रकाश ओसवाल यांनाही त्यांच्या एमार्क स्क्वेअर या इमारतीच्या बांधकामाच्या अनुषंगाने वेगवेगळया माध्यमातून धमकावत होता व इमारतीचे बांधकाम विनाअडथळा सुरु ठेवण्याकरिता त्यांच्याकडे ५ लाख रुपयांची खंडणीची मागणी केली होती. निरज ओसवाल यांनी २५ हजार सोमवारी दिले.व आणखी १ लाख ५० हजारांची मागील केली असता निरज ओसवाल यांनी तक्रार केली होती.

खोपोली प्रभारी पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत, सपोनि. मनोज ठाकरे, पोउप नि. अभिजीत व्हरांबळे व पथकाने ही कारवाइ केली. अशाप्रकारे सर्वसामान्य नागरिकांना त्रास देऊन कोणत्याही लाभाची मागणी केली असल्यास नागरिकांनी खोपोली पोलीस ठाणे येथे संपर्क करुन तक्रार देण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक शितल राऊत यांनी केले आहे.

# महाडमध्ये मुसळधार पाऊस

## पूरजन्य परिस्थिती उद्‌भवण्याची भीती



**महाड : प्रतिनिधी**

मे महिन्यात सुरू झालेला पाऊस जून महिन्यामध्ये चांगलाच कोसळत असून गेली दोन दिवस महाड आणि परिसराला मुसळधार पावसाने चांगले झोडपून काढले आहे. यामुळे तालुक्यातील नद्या तुडुंब भरून वाहू लागल्या आहेत पूरजन्य परिस्थिती उद्भवण्याच्या शक्यतेने नागरिकांमध्ये मात्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दोन दिवस महाड तालुक्यामध्ये मुसळधार पर्जन्यवृष्टी होत आहे. यामुळे तालुक्यातील सावित्री, गांधारी, काळ या नद्या तुडुंब भरून वाहू लागल्या आहेत. महाड तालुक्यातील प्रतिवर्षी उद्भवणारी पूरजन्य परिस्थिती कायम नुकसान करत असल्याने दोन दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसाने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे स्थानिक प्रशासनाने पुराशी सामना करण्यासाठी जय्यत तयारी केली आहे. आपत्कालीन व्यवस्थापन देखील सज्ज झाले आहे. शहरामध्ये विविध ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने उत्खनन आणि माती भराव झाल्याने नदी बाहेर येणारे पाणी वेगवेगळ्या भागात फिरण्याची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे.

आज सकाळी दस्तुरी नाका ते नातेखिंड या मार्गावर देखील पाण्याचा निचरा न झाल्याने पाणी साचून राहिले होते. तर गांधार पाले परिसरात देखील नदीचे पाणी शिरल्यामुळे पूरजन्य दिसून येत होती. या पाण्यामुळे मात्र शेतीचे नुकसान झाले आहे. महाड तालुक्यात गेली दोन दिवसात १८९ एमएम पाऊस झाला आहे. शेजारील महाबळेश्वर, किल्ले रायगड परिसर आणि वाळन खोऱ्यामध्ये पर्जन्यवृष्टी मोठ्या प्रमाणात होत असते याचा परिणाम महाड शहराला जाणवतो. त्यामुळे प्रशासन या भागावर देखील लक्ष ठेवून आहे. महाबळेश्वर परिसरामध्ये देखील मुसळधार पर्जन्यवृष्टी होत असल्याने येथील पाणी मोठ्या प्रमाणावर सावित्री नदीच्या माध्यमातून शहरांमध्ये दाखल होत असल्याने यावर देखील प्रशासन लक्ष देत आहे.

हवामान खात्याने पर्जन्यवृष्टीचा इशारा दिल्यानंतर आणि तालुक्यात पडणाऱ्या अतिवृष्टीमुळे शाळांना सुट्टी देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्यानंतर महाड तालुक्यातील शाळा तात्काळ सोडण्यात आल्या.



# भिलवले परिसरात विद्युत पुरवठा खंडित



**चौक : प्रतिनिधी**

भिलवले येथे वीज पुरवठा करणाऱ्या जनित्रात बिघाड झाल्याने दोन दिवस अंधाराचे साम्राज्य पसरले आहे, त्यातच येथील अधिकारी यांची बदली झाली की रजेवर आहेत? हे समजत नसल्याने जनतेत अंधार पसरला आहे.

भिलवले परिसरात वीज पुरवठा करण्यात येणाऱ्या जनीत्रात बिघाड झाल्याची माहिती समोर आली असून दोन दिवस अंधाराचे साम्राज्य पसरले आहे, लहान मुले, वयोवृद्ध यांना त्रास होत असून झोप उडाली असून डास आणि मच्छर यांनी आपले साम्राज्य उभे केले आहे, तर पाणी पुरवठा खंडित असून व्यावसायिक यांचे नुकसान झाले आहे. याच बरोबर विनेगाव, वावंढळ, आसरे, चौक परिसर येथील लाईट लपंडाव खेळत आहे, उप अभियंता खालापूर यांना याकडे लक्ष देण्यास वेळ नाही, तर ग्राहकांशी चर्चा करण्यासाठी देखील वेळ नाल्याचे स्थानिक कार्यकर्ते यांचे म्हणणे आहे. कनिष्ठ अभियंता रजेवर आहेत की त्यांची बदली झाली? हेही कळत नाही.

विद्युत पुरवठा करणारे विद्युत खांब हे वाकतात, उन्मळून वाकतात यासाठी ठेकेदार यांनी हे खांब किती खोल खड्ड्यात उभे केले होते? उभे केल्यावर त्याच्या पायाभरणी वर पाणी टाकून पक्के करण्याचा प्रयत्न केला होता का? याचे ऑडिट होणे गरजेचे आहे, असे सामाजिक कार्यकर्ते यांचे मत आहे.



**खालापूर,मोहपाडा : पाताळगंगा नदी पात्रात तीन व्यक्ती अडकल्याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यू ऑपरेशन अपघातग्रस्त टिमने नदीपात्रात अडकलेल्या तुकाराम पवार, शंकर चव्हाण, संतोष चव्हाण या तीनही जणांना सुखरूप बाहेर काढले.**


**उरण नगरपरिषद**
**निविदा सूचना**

जा.क्र.उनप/बांवि/८४८/२०२५-२०२६
उरण नगरपरिषद
उरण, दिनांक :- १९/०६/२०२५

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा दिनांक ३०/०६/२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २% रोखीने | ७% बिलातून | | |
| १. | उरण नगरपरिषद हद्दीतील मासळी मार्केट व भाजी मार्केट इमारतीला नवीन रोलिंग शटर बसविणे. | रु.२,००,०००/- | २,०००/- | ४,०००/- | १४,०००/- | २५ दिवस | ५००/- |
| २. | उरण नगरपरिषद हद्दीतील उरण भवरा येथील श्री. भालचंद्र घरत यांचे घरापासून ते श्री. मधुकर पडवळ यांचे घरापर्यंतचा नाला दुरुस्त करणे. | रु.१,२१,५५३/- | १,२१५/- | २,४३१/- | ८,५०९/- | २५ दिवस | ५००/- |
| ३. | उरण नगरपरिषद हद्दीतील विमला तलावालगत साने गुरुजी बालोद्यान गेट समोरील गटार दुरुस्ती व इतर किरकोळ दुरुस्ती करणे. | रु. ८५,६१४/- | ८५६/- | १,७१२/- | ५,९९३/- | २५ दिवस | ५००/- |

सदर कामाच्या अटी/शर्ती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

सही/-
( समीर जाधव)
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद,उरण



**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक/आरटीएस/अपील क्र. ३११/२०२४

१ व्हॅल्यूएबल प्रॉपर्टीज प्रा. लि. तर्फे
श्री. प्रसाद मनोहर सावंत
पत्ता - शगुफा को. ऑप. हौ. सोसायटी,
प्लॉट नं. ५८ अ, सीवूड, नेरुळ, नवी मुंबई
} अपिलार्थी

**विरुध्द**

१ श्रीम. पार्वतीबाई महादू शेळके
२ श्री. सुदाम गोटया शेळके
३ श्री. संतोष सुदाम शेळके
४ श्री. बाळाराम गोटया शेळके
५ श्री. काशिनाथ गणा शेळके
६ श्री. प्रकाश गणा शेळके
७ श्रीम. निर्मला गणा शेळके
८ श्रीम. कुंदा गणा शेळके
९ श्रीम. निरा सुरेश डांगरकर
सर्व रा. पाली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड
} उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे पालीखुर्द, ता. पनवेल, जि. रायगड येथील सव्र्हे नं. २४/० क्षेत्र ०-२९-१ आकार ६.३१ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील आरटीएस अपील क्र. १४३/२०२४, दि. ०८/०७/२०२४ मधील आदेशाविरुध्द अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये **दि. २७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी **अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड** येथे निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस-हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैररहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०९/०६/२०२५

सही/-
अपर जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग करीता



**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड येथील **मोनिका प्रकाश पाटील व इतर ३ यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी** हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे भिंगार, तालुका, पनवेल, जि. रायगड,**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मोनिका प्रकाश पाटील<br>आनंदराव महादेव भोसले<br>मंजुश्री समाधान शिंदे<br>सुषमा सुरेश कसशीद | १५७ | ५ | ०-१२-६०<br>पो.ख ०-०१-३०<br>०-१३-९० | २.८१ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक:-
१९/०६/२०२५

सही/-
ॲड विजय भगत ॲन्ड असोशिएटस्
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com



**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस आमच्या अशिल श्रीमती लिलावती राम मालकर उर्फ लिलावती गोविंद जुनगरे यांचे वतीने या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल था मूळपुरूष कै. गोपाळ नामा जुनगरे यांची नात आणि कै. गोविंद गोपाळ जुनगरे यांची मुलगी आहेत. कै. गोपाळ नामा जुनगरे यांना कुळ कायद्यांतर्गत प्राप्त झालेल्या मिळकतींचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मौजे आष्टे, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १३१ | १ | ०-४०-० | २-७५ |

सदरहू वाडवडिलोपार्जित मिळकतीमधील आमच्या अशिलांचा आणि अन्य बहिणींचा हिस्सा डावलत, केवळ श्री. सावळाराम गोविंद जुनगरे आणि श्री. गणेश गोविंद जुनगरे या दोन भावांना, जमीन मिळकत विकण्याचा वडिलांना अजिबात हक्क व अधिकार नव्हता. सबब दस्त अनुक्रमांक ८०२१/२०११ प व ल-१ हा खरेदीखताचा दस्त आणि दस्त अनुक्रमांक १५४०/२०२४ प व ल-४ द्वारे सदर जमीन मिळकतीतील २० गुंठे क्षेत्राचा, त्रयस्थ इसमास केलेला व्यवहार पूर्णतः बेकायदेशीर, निरर्थक आणि अर्थशून्य आहे याची सर्वांनी सक्त जाणीव ठेवावी.

पिढीजात मिळकतीमधील स्वतःच्या १/५ न्याय्य वारस हक्काच्या रक्षणाकरीता आमच्या अशिल न्यायालयीन प्रक्रियेचा अवलंब करणार आहेत. सबब कुणाही व्यक्ती अथवा संस्थेने वरील मिळकतीमध्ये, कोणत्याही प्रकारचा ताबा कब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, गहाणखत, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा, लिज, दान, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध निर्माण करू नये. असे कोणतेही हक्कहितसंबंध आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक:- २०/०६/२०२५

सही/-
ॲड. माधुरी राजन धळकर,
ऑफिसः शॉप क्र.१, साई प्रसाद
सी.एच.एस.प्लॉट नं. ९८/२, नित्यानंद
मार्ग, पनवेल-४१०२०६


वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | मे. अनमोल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर बिरेंद्र कुमार,साह.,प्लॉट नं.२.,रोड. क्र.. ६,,सेक्रटर. १२,,नवीन पनवेल (पूर्व),ता. पनवेल, जि. रायगड. | ०१ उंबर व ०१ आंबा अशी. एकूण. ०२. झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.२. रोड. क्र.. ६. सेक्टर, १२,, नवीन. पनवेल (पूर्व), ता. पनवेल, जि. रायगड येथे ०१ उंबर व ०१ आंबा अशी एकूण ०२ झाडे नवीन इमारत बांधकामात अडथळा होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. २७२/२७५/२०२५
दिनांक :- १९/०६/२०२५

सही/-
(स्वरुप खारगे)
उपायुक्त(वृक्ष प्राधिकरणक)
पनवेल महानगरपालिका

# नवी मुंबईतील ५०१ धोकादायक इमारती

## महापालिकेकडून यादी जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२५-२०२६ या वर्षासाठी विभागवार सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षणानंतर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ५०१ इमारती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये, अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे अशा 'सी-१' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ५१ इमारती तसेच इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ ए' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या १०४ इमारती आणि इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ बी' प्रवर्गामध्ये मोडणा-या २९७ इमारती त्याचप्रमाणे इमारतीची किरकोळ दुरूस्ती या 'सी-३' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ४९ इमारती, अशाप्रकारे एकूण ५०१ धोकादायक इमारतींची यादी घोषित करण्यात आलेली आहे.



ही यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाईटवर 'विभाग' सेक्शनमध्ये 'अतिक्रमण विभाग' माहितीच्या सेक्शनमध्ये 'सामान्य माहिती' या अंतर्गत अवलोकनासाठी सहज उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या यादीमध्ये अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करण्याच्या 'सी-१' प्रवर्गामध्ये नमूद ५१ इमारतींची नावे व तपशील नागरिकांना सहज कळावा यादृष्टीने ठळक (इजडऊ) अक्षरात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

या इमारतींमधील निवासी अथवा वाणिज्य वापर तात्काळ थांबविणेबाबत तसेच धोकादायक इमारतींचे बांधकाम विनाविलंब तोडून टाकणेबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील ५ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार लेखी सूचना अथवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. 'सी-१' प्रवर्गातील इमारतीची विद्युत व जलजोडणी खंडीत करण्यात येईल असेही यात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे मालक अथवा भोगवटादार यांनी ते रहात असलेल्या इमारतीचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारत कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचा संभव लक्षात घेऊन सदर इमारतीचा अथवा बांधकामाचा निवासी अथवा वाणिज्य वापर त्वरित बंद करावा आणि सदरची इमारत अथवा बांधकाम विनाविलंब तोडून टाकावे असे सूचित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची कार्यवाही न केल्यास, सदर इमारत अथवा बांधकाम कोसळल्यास होणाऱ्या नुकसानीस फक्त संबंधित जबाबदार असतील, नवी मुंबई महानगरपालिका यास जबाबदार राहणार नाही असे स्सूचित करण्यात आलेले आहे.

नोटिसीमध्ये धोकादायक इमारतींच्या नावासमोर रहिवास वापर सुरू आहे अथवा नाही याचीही नोंद करण्यात आलेली आहे. इमारतीच्या वर्गीकरणानुसार इमारतींचा भोगवटा वापर करणाऱ्या नागरिकांनी इमारत तात्काळ निष्कासीत करावयाची आहे किंवा वर्गीकरणानुसार नमूद केल्याप्रमाणे इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या भोगवटाधारकांनी इमारत दुरुस्त करून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. याबाबत कोणत्याही प्रकारे धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद, घ्यावी असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### वापर थांबविण्याचे आवाहन

पावसाळा कालावधीत धोकादायक झालेल्या इमारतींचा/घरांचा वापर करणे धोक्याचे आहे. त्यामुळे जिवित व वित्तहानी होऊ शकते. म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा वापर तत्काळ थांबविण्यात यावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे, अन्यथा दुर्देवीरित्या अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधिताची राहील याची नोंद घ्यावयाची आहे.

# मांस विक्रेत्यांच्या जनजागृतीसाठी नवी मुंबईत माहितीपर कार्यशाळा



**नवी मुंबई : बातमीदार**

नमुंमपा कार्यक्षेत्रामधील कुक्कुट, शेळी अथवा मेंढी मांस विक्रेते यांच्या जनजागृतीसाठी मुंबई पशुवैदयकीय महाविद्यालयातील पशुवैद्यकीय सामुहिक स्वास्थ विभागामध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कापणी पश्चात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान योजना कार्यरत आहे.

या योजनेंतर्गत स्वच्छ आणि सुरक्षीत कुक्कुट, शेळी अथवा मेढीं मांस उत्पादन करण्याकरिता तंत्रज्ञान विकसीत करण्यात आले आहे. या तंत्रज्ञानाविषयी नमुंमपा कार्यक्षेत्रातील मांस विक्रेत्यांना माहिती देण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात मुंबई पशुवैदयकीय महाविद्यालय परेल आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये नमुंमपा कार्यक्षेत्रातील मांस विक्रेते मोठया प्रमाणात सहभागी झाले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे प्राध्यापक व योजना प्रमुख डॉ.रविंद्र झेंडे यांनी स्वच्छ मांस निर्मितीसाठी विकसीत तंत्रज्ञानाचे सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी व्यवसाय वृद्धीकरिता योग्य उपाय सांगून उपस्थित मांस विक्रेत्यांना प्रेरणा दिली.

महानगरपालिकेचे वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे यांनी मांस उत्पादन करताना वैयक्तिक आरोग्य व ग्राहकांचे आरोग्य याकडे लक्ष देण्याचे महत्त्व विशद केले. पशू वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रीकांत तोडकर यांनी टाकाऊ पदार्थांच्या पुनर्वापरातून नफा वाढवण्याचे मार्ग सूचवले आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाबाबत माहिती दिली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात डॉ.विलास वैद्य, डॉ.विवेक शुक्ला, सुरेन तांबे, संतोषकुमार कोरी व इतर अधिकारी, कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले. मुंबई पशुवैदयकीय महाविद्यालयाचे सहा.प्राध्यापक डॉ.विवेक शुक्ला यांनी आभार मानले.












**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचा वाढदिवस गुरुवारी साजरा झाला. यानिमित्त भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, अजय बहिरा, बबन मुकादम, मनोज भुजबळ, वृषाली वाघमारे, राजश्री वावेकर, रवी भोईर, कर्जत मंडळ अध्यक्ष राजेश भगत, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, अमरीश मोकल, निलेश पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सुशील शर्मा, सरचिटणीस रूपेश नागवेकर, स्वप्नील ठाकूर, अतुल बडगुजर यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी अविनाश कोळी यांचे अभीष्टचिंतन केले.**

# दोस्त संस्थेची अवयवदान, आरोग्यसेवा दिंडी पंढरीकडे

**पनवेल : वार्ताहर**

आषाढी वारी सोहळ्यादरम्यान 'दोस्त' मुंबई या संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे अवयवदान व आरोग्यसेवा दिंडीचे आयोजन करण्यात आले असून ह्या दिंडीचा प्रस्थान सोहळा कामोठे येथील वेस्टर्न हिल्स हायस्कूलच्या प्रांगणात झाला.

या वेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार प्रमोद चुंचुवार, कामोठे डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष व बालरोगतज्ज्ञ डॉ संतोष कानगुले, आरोग्य सेवेतील कक्ष अधिकारी, लेखक वैभव मोहन पाटील तसेच पनवेल मनपाचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, सतीश पाटील आदी उपस्थित होते.

'दोस्त चे संस्थापक डॉ.कैलास जवादे यांनी संस्थेच्या कार्याचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडताना संस्थेची आजवरची वाटचाल व भविष्यातील नियोजनाविषयी माहिती दिली. 'दोस्त'च्या कार्यकर्त्यांनी अवयवदान चळवळीतील दोन भन्नाट पथनाट्ये सादर करत अवयव दानाबाबत जनजागृती केली. गेल्या ११ वर्षांपासून 'दोस्त' संस्थेमार्फत ह्या आरोग्य दिंडीचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमादरम्यान वारीमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती आणि आरोग्यविषयक कार्यक्रम राबविण्यात येतात. यामध्ये कॅन्सर जनजागृती, लिव्हर किडनी व पचन संस्था आरोग्य कार्यक्रम, वैद्यकीय शिबीर, चरण सेवा, शस्त्रक्रिया सल्ला, फायब्रोस्कॅन तपासणी इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

कामोठे डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने दोस्त संस्थेसाठी आर्थिक मदतीचा धनादेशदेखील या वेळी देऊन वारीतील आरोग्य सेवेस हातभार लावण्यात आला. लेखक वैभव पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात आरोग्य दिंडी दरम्यान अवयवदानाबरोबरच संसर्गजन्य, असंसर्गजन्य आजार तसेच कोविड बाबत जनजागृती करण्याचा सल्ला संस्थेच्या उपस्थित विद्यार्थी-कार्यकर्त्यांना दिला. भाषणाच्या शेवटी वैभव पाटील यांनी अवयवदान जनजागृतीपर स्वलिखित कविता सादर करत उपस्थितांची दाद मिळवली.

# वीर वाजेकर महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकनात उल्लेखनीय यश

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, महालण विभाग, फुंडे (उरण) या महाविद्यालयाचे चौथे नॅक मूल्यांकन नुकतेच यशस्वीपणे पार पडले असून, महाविद्यालयास २.९९ सीजीपीएसह बी++ ही प्रतिष्ठेची श्रेणी प्राप्त झाली आहे. हे मूल्यांकन पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने पार पडले. विशेष बाब म्हणजे, तिसऱ्या मूल्यांकनाच्या तुलनेत या वेळी संस्थेने तब्बल ४१ गुणांची भर घालून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

या उल्लेखनीय यशानंतर रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार, उपाध्यक्ष भगीरथ शिंदे, पी. जे. पाटील, चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, संघटक डॉ. अनिल पाटील, सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, ऑडिटर डॉ. राजेंद्र मोरे, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुधीर घरत, तसेच रयत शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, माजी विद्यार्थी संघाचे सदस्य, तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, हे यश म्हणजे विद्यार्थी, सर्व सेवक, महाविद्यालय विकास समिती,माजी विद्यार्थी व संस्था पदाधिकारी या सर्वांचे संयुक्त व समर्पित प्रयत्न यांचे फलित आहे. गुणवत्ता वृद्धीसाठी सर्वांनी एकजूटीने काम केले, यामुळेच हे यश शक्य झाले.




**रसायनी : आपटा परिसरात रात्रभर जोरदार पावसामुळे पाताळगंगा नदीच्या पाण्याची पातळी वाढली. हे पाणी आपटा गावातील श्री बापुजी मंदिराच्या आवारात घुसले. येथे बंधारा नसल्याने हेच पाणी गावात घुसते. म्हणून जर घाट बांधला तर तेथून पुराचे पाणी गावात येणार नाही. तेथे बंधारा बांधला पाहिजे. ही जागा जर पूर्णपणे बंदिस्त केली तरी गावात पाणी व पूर येणार नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.**

## निवडक

### खालापुरात एक जण बुडाला



**खालापूर :** तालुक्यातील वावोशी पोलीस स्टेशनच्या हद्दीत नदीपात्रात एक मृतदेह तरंगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असता सामाजिक कार्यकर्ते गुरू साठीलकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाण्यातून शव बाहेर काढून शवविच्छेदनासाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे आधार कार्ड आणि इलेक्शन कार्ड त्याच्या पाकेट मधे सापडले असून बबन काशिनाथ पवार (वय ४५, रा. उंबरवाडी टाकवे, मावळ, पुणे) असे बुडालेल्या मृत व्यक्तीचे नाव आहे.

### हटाळे शाळेत विद्यार्थी प्रवेशोत्सव




**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील नागाव केंद्राअंतर्गत येणारी नागाव हटाळे शाळेत सोमवारी शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील, नागांवच्या सरपंच हर्षदा मयेकर, नागांवचे केंद्र प्रमुख प्राची ठाकूर, उपसरपंच सुरेंद्र नागलेकर, हर्षदा गायकवाड, डॉ. संदीप वारगे, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.

### रुद्रवली शाळेत प्रवेशोत्सव

**माणगाव :** तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद रुद्रवली शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात झाला. या कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढून करण्यात येऊन या वेळी विद्यार्थी पालक व मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे स्वागत हे गुलाब पुष्पे सेल्फी पॉईंट यांनी केले. विद्यार्थ्यांचे हाताचे ठसे घेऊन त्यांना गोड खाऊ देण्यात आला. मुलांना मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आली. मुंबई मंडळाचे अध्यक्ष भागोजी खामकर यांनी दिलेले वह्या व पेन यांचे वाटप करण्यात आले.

### रमेश पवार यांना कायद्याची पदवी



**पाली :** सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा हद्दीतील घोडपापड आदिवासी वाडीतील रहिवासी आणि आदिवासी समाजाचे नेते रमेश पवार यांनी नुकतीच कायद्याची पदवी मिळवली आहे. रमेश पवार यांनी कायद्याची पदवी घेतल्याने आदिवासी समाजाबरोबर च बहुजन समाजातील तरुणांपुढे एक प्रेरणा आदर्श उभा राहिला आहे. त्यांचा विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून, सामाजिक संस्था संघटना यांच्याकडून सत्कार होत आहे.

### पेझारी येथे नवागतांचे स्वागत



**पाली :** आदर्श शाळा पेझारी येथे नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत रायगड जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांच्या हस्ते गुलाब पुष्प, फुगे चॉकलेट, देऊन वाजत गाजत स्वागत करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागतासाठी माजी गटशिक्षणाधिकारी नितिष पाटील, शाळा विकास समिती अध्यक्ष सुरेश म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. निलेश म्हात्रे, मुख्याध्यापिका निलिमा पाटील, अशिया काजळे, लीना तोडणकर आदी उपस्थित होते.

### जावळी शाळेत प्रवेशोत्सव



**माणगाव :** रा. जि. प शाळा जावळी येथे विद्यार्थ्यांना प्रवेशोत्सव रोजी उत्साहात झाली. या वेळी दखल पात्र विद्यार्थ्यांचे लेझीम पथकाद्वारे वाजत गाजत स्वागत करण्यात आले त्यानंतर दाखलपात्र विद्यार्थ्यांची सन्मानाने आरती करून पुष्पगुच्छ देऊन शाळेतील त्यांचे पहिले पाऊल उमटवून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमासाठी दिया पालकर, सिद्धी पालकर, सुनीता साजेकर, प्रेरणा बडे, अर्चित भावेश पालकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक निलेश उभारे व उपशिक्षिका विद्या लोमटे यांनी उत्कृष्टपणे केले होते.

### दहिवली भागात वृक्षारोपण

**कर्जत :** तालुक्यातील दहिवली भागात असलेल्या कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. आत्ता पर्यंत तीन हजारच्या वर वृक्षाचे संगोपन करण्यात आले असून या वृक्ष संगोपनाची जबाबदारी विद्यार्थ्यांनी घेतली आहे. निवृत्त मोटर वाहन निरीक्षक दत्तात्रय लाड यांनी राहुल धारकर फार्मसी महाविद्यायाला सदिच्छा भेट दिली. प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी उप प्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, कार्यालयीन अधीक्षक निकेत मांडवळे, विजय जिनगरे तसेच प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नागोठण्यात पूरस्थिती; सतर्कतेचा इशारा

**नागोठणे : प्रतिनिधी**

रात्रभर पडत असलेला मुसळधार पावसामुळे अंबा नदी ओसंडून वाहू लागली असून नागोठणे अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असल्यामुळे नागोठणे शहरात पुरस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, रोहा तहसीलदार, नागोठणे पोलीस स्टेशन व ग्रामपंचायत प्रशासन यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.





पुरासाठी ईन्शुरन्स कंपनीने ईन्शुरन्स नाकारल्यामुळे व्यापारी वर्ग चिंतेत सापडले आहेत. दरम्यान, नागोठणे शहराची पूरस्थितीची नागोठणे ग्रामपंचायतीचे सरपंच सुप्रिया संजय महाडिक, पहिले लोकनियुक्त सरपंच तथा सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, नागोठणे उपसरपंच अखलाक पानसरे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे, सदस्या सौ. अमृता महाडिक,सौ. भाविका गिजे, सुप्रिया काकडे, पूनम काळे आदिंसह कर्मचारी वर्गाने पाहणी करून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.

गुरुवारी पहाटेपासून नागोठणे अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असल्यामुळे पाणी नागोठणे एस. टी. स्टॅन्ड, शिवसेना शाखा, छत्रपती शिवाजी महाराज चौक व बाजारपेठ तसेच विशाल मेडिकल परिसर, कोळीवाडा तसेच हॉटेल लेकव्हूव परिसरात पाणी शिरल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून छत्रपती शिवाजी महाराज चौक व बाजारपेठ मधील व्यापाऱ्यांनी धसका घेतला आहे. यावर्षी ईन्शुरन्स कंपनीने नागोठणे येथील व्यापाऱ्यांचा ईन्शुरन्स काढण्यासाठी मनाई केल्यामुळे कोणत्याही व्यापाऱ्याला पुराचे नुकसान भरापाई मिळणार नसणार आहे. त्यामुळे गुरुवारी आलेल्या पुरामुळे नागोठणे बाजारपेठ मधील व्यापाऱ्यांनी चांगलाच धसका घेतला आहे.

या पूरस्थितीमुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक व बाजारपेठ परिसरातील व्यापारी आपापले सामान सुरक्षित स्थळी नेत आहेत. दरम्यान पावसाने थोड्याफार प्रमाणात शांतता घेतल्यामुळे व्यापारी वर्गाने श्वास सोडला असल्याचे पाहवयास मिळत आहे.

पुरा व्यतिरिक्त इतर नैसर्गिक आपत्तीसाठी ईन्शुरन्स - व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाशशेठ जैन गेले २० ते २५ वर्ष ओरिएंट ईन्शुरन्स कंपनी आम्हा व्यापारी वर्गाला पुर असो वा इतर नैसर्गिक आपत्ती असो ईन्शुरन्स देत होती, परंतु या वर्षी नागोठण्यातील व्यापारी संतोष कोते यांना ओरिएंट ईन्शुरन्स कंपनीने ईन्शुरन्स देण्यासाठी मनाई केली होती. संतोष कोते यांची आमच्या कडे तक्रार आल्यानंतर आम्ही ओरिएंट ईन्शुरन्स कंपनीला पत्रव्यवहार केला त्यांनी सांगितले की, नागोठणे शहर हे पुर रेषेखाली येत असल्यामुळे आम्ही आपणास पुरा संबंधित ईन्शुरन्स देऊ शकणार नाहीत. गेले २० ते २५ वर्ष आम्हाला पुराचा ईन्शुरन्स मिळाला या वर्षीच का नाकारला याबाबत आम्ही त्यांना जाब विचारला परंतु त्यांनी नकारच दिला. त्यानंतर त्यांनी आम्हाला पुरा व्यतिरिक्त इतर नैसर्गिक आपत्तीसाठी ईन्शुरन्स दिला असून आम्ही इतर ईन्शुरन्स कंपनीच्या संपर्कात आहोत, असे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश जैन यांनी सांगितले.



**माणगाव : तालुक्यात मुसळधार पावसाने थैमान घातले असून सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. येथील काळ नदी तुडुंब भरली असून तिने धोक्याची पातळी ओलांडली असल्याने प्रशासनाने नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.**

## आगामी सर्व निवडणुकांत भाजप बाजी मारणार -यशवंत साबळे



**खोपोली : प्रतिनिधी**

आगामी सर्व निवडणुकीत भारतीय जनता पक्ष घवघवीत यश प्राप्त करणार असल्याने कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे व कमळ घरोघरी पोहचवावा, असे आवाहन ज्यष्ठ कार्यकर्ते यशवंत साबळे यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीत आवाहन केले.

भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर दोनच दिवसात यशवंत साबळे यांनी शहरातील पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयाला भेट दिली. या वेळी त्यांच्यासोबत भाजपमध्ये प्रवेश केलेले अविनाश तावडे, विक्रम साबळे, सुहास वझरकर यांनी खोपोली शहरातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात जाऊन तेथील कार्यकर्त्यांशी संवाद साधला, यावेळी त्यांचे उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत केले, दीपक चौकात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

माजी अध्यक्ष रमेश रेटरेकर यांनी साबळे यांच्या भाजपात आल्यानंतर कार्यकर्त्यात उत्साह संचारला असून'आगामी काळात पक्षाला बळकट येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या वेळी माजी अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल यांनी आपले विचार मांडताना साबळे कुटुंबाचा खोपोलीच्या जडणघडणीत सिंहाचावाटा असल्याचे सांगितले.

या वेळी डॉ.बबन नागरगोजे, दिलीप पवार शहर महिला अध्यक्ष अश्विनी अत्रे, विकास खुरपडे, स्नेहल सावंत, सुमती महर्षी, अपर्णा मोरे, ऋषिकेश म्हात्रे, विभा पाठक, सीमा मोगरे, यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पावसाच्या तडाख्यामुळे खरबाचीवाडीत घर कोसळले

**धाटाव : प्रतिनिधी**

संपूर्ण रायगड जिल्ह्यासह रोह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. या पावसाच्या तडाख्यामुळे रोहा तालुक्यातील चिंचोली तर्फे अतोंने ग्रामपंचायत हद्दीतील खरबाची वाडी (वडाची वाडी) येथील राजेश गोपीनाथ जाधव यांचे घर पूर्णतः कोसळले हि घटना रात्री १२ वाजता घडली असून घरातील सामानाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेला आहे.



यामध्ये एक बाईक व अन्य साहित्य आहे, मात्र रात्रीच्या मुसळधार पावसाचा अंदाज घेऊन घरात राहत असलेले इतर ५ लोक बाजूच्या घरात गेल्यामुळे त्यांचे देखील जिव वाचलेला आहे. दरम्यान, खरबाची वाडी येथील घरमालक राजेश गोपीनाथ जाधव, पत्नी सविता राजेश जाधव, मुलगी वैष्णवी, मुलगा विनायक व राकेश असे पाच जणांचे कुटुंब या ठिकाणी राहत होते. काल रात्री सोसाट्याचा वारा व मुसळधार पाऊस याचा अंदाज घेऊन आपल्या बहिणीकडे छाया महेश वाघमारे तिच्या घरी रात्री वाजता झोपायला गेले असल्याने जीवितहानी टळली, परंतु बाईकचे नुकसान झाले. त्याचबरोबर, एक टीव्ही, दोन टाक्यात तांदूळ व नाचणी तसेच घरातील इतर भांडी, कपडे यांचेदेखील नुकसान मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. त्यामुळे तत्काळ या घटनेचा पंचनामा करून मदत मिळून द्यावी अशी मागणीदेखील केली जात आहे. तर चिंचोली तर्फे आतोंने चे प्रशासकीय अधिकारी रणजीत लवटे व ग्रामसेवक त्यांनीदेखील भेट देऊन घटनेची माहिती घेत असल्याचे समजत आहे.

## उतेखोलवाडी शाळेत विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या पीएमश्री रायगड जिल्हा परिषद उतेखोलवाडी शाळेत मंगळवारी पनवेलचे डाएट जेष्ठ अधिव्याख्याता कामशेठी यांच्याहस्ते विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी हा उद्देश नजरे समोर ठेऊन गणवेश आणि पाठयपुस्तकांचे वाटप करण्यात आले.



पीएमश्री राजीप शाळा उतेखोलवाडी येथे शाळा प्रवेशोत्सव निमित्ताने कामशेठी यांनी शाळेला भेट दिली. यावेळी कामशेठी यांच्याहस्ते सुरवातीला वृक्षारोपण करून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच शिक्षकांशी संवाद साधून शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना चांगले संस्कारक्षम शिक्षण येथील शिक्षक देत असल्याने सर्व शिक्षकांचे विशेष कौतुक करून ज्ञानाची गंगोत्री ज्यांचे ठायी अशी उतेखोलवाडी शाळा अशा शब्दांत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास केंद्रप्रमुख शंकर शिंदे, साधन व्यक्ती बेंदुगडे, आदर्श शिक्षिका विनया जाधव, शमिका आंबुर्ले, मुख्याध्यापक स्नेहल उतेकर, शिक्षिका, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

## तळा येथील पेरणी पूर्णत्वाकडे

**तळा : प्रतिनिधी**

यावर्षी अवकाळी पासून लवकरच पडला होता नंतर मान्सून पावसालाही सुरूवात झाली होती या लवकर पडलेल्या पावसामुळे पेरणी करण्याची मोठी अडचण तळा तालुक्यात झाली होती, मात्र शेतकऱ्यांनी अंदाज करून पेरणीला सुरूवात करून तालुक्यातील बोरघरहवेली, भानंग, गिरणे, मांदाड, पिटसई, तळेगाव, गायमुख, इत्यादी विभागात पेरणीची कामे पुर्णत्वास आली आहेत.

सध्या पडत असलेला पाऊस सध्यस्थितीत शेतीला योग्य असल्याचे शेतकरी वर्गातून म्हटले जात आहे. सध्या रोपे चांगल्या पध्दतीने वाढतील व लावणीला काही दिवसांनी सुरूवात होणार असल्याचे म्हटले जात आहे. पावसाने दमदार हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला आहे. असाच चांगला पाऊस पडत राहीला तर शेतीचे पिक चांगले येईल.

**सध्याचा पाऊस शेतीला उपयुक्त**



विविध भाताच्या जातीची पिकांची लागवड केली आहे. चांगल्या पध्दतीने यावर्षी उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे, असे शेतकरी वर्ग म्हणत आहे.

## स्व. तात्यासाहेब टके यांची पुण्यतिथी

**नागोठणे : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागातील नेते खासदार सुनिल तटकरे यांचे कौटुंबिक स्नेही भाईसाहेब टके व हरीश टके यांचे वडील, स्व. दत्ताजीराव तटकरे यांचे कौटुंबिक स्नेही तथा नागोठण्यातील तत्कालीन सामाजिक कार्यकर्ते स्व. तात्यासाहेब उर्फ पांडुरंग गोविंद टके यांची २५ वी पुण्यतिथी बुधवारी दिलीपभाई टके यांच्या पांडुरंग निवास नागोठणे येथे झाली.

या कार्यक्रमास हभप नरेश महाराज जाधव, स्व. तात्यासाहेब टके यांचे सुपुत्र भाईसाहेब टके, हरीश टके, सनुषा दिपाली दिलीप टके, सौ. कल्पना हरीश टके व जावई प्रमोद मुकादम यांच्या समवेत राष्ट्रवादीचे नेते रजिप माजी सदस्य नरेंद्रशेठ जैन, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, मनसे नेते गोवर्धनभाई पोलसानी, राष्ट्रवादीचे नेते शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, मधुकर ठमके, डॉ. राजेंद्र धात्रक, हरीशशेठ काळे, नागोठणे माजी सरपंच विलास चौलकर, नागोठणेचे पहिले लोकनियुक्त सरपंच विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, माजी सरपंच प्रकाशशेठ जैन, आदींसह ग्रामस्थ, दिलीपभाई टके व हरीशभाई टके यांचा मित्रपरिवार कौटुंबिक स्नेही बहुसंख्येने उपस्थित होते.



## 'यशस्वी होण्यासाठी शिक्षण गरजेचे'

**मुरूड : प्रतिनिधी**

शिक्षण हे आयुष्यात यशस्वी होण्याचे मध्यम असून सर्वांनी शिक्षण घेऊन सुशिक्षित व्हा, असे मोलाचे मार्गदर्शन माऊंट कर्मेल हायस्कूल चे चेअरमन फादर बोनवेंचर नुनिस यांनी मोफत पुस्तक वाटप प्रसंगी केले आहे. या वेळी इयत्ता पाचवी ते आठवी मधील सुमारे १२० शालेय विद्यार्थ्याना मोफत पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले.



संस्थेचे मॅनेजर - रेव्ह फादर बोनावेंचर नुनीस, मुख्याध्यापिका-सिस्टर जुली चांदी, सहाय्यक शिक्षक - राजेंद्र घोसाळकर, सुरेश वेगस, रोशन मार्तीस, शोधन बलकवडे, सहाय्यक शिक्षिका - सिस्टर - शोभा त्रिभुवन, शुभांगी पंची, श्रीमती - अक्षता म्हात्रे, प्रयोगशाळा परिचारक अल्बर्ट मार्तीस,मुख्य लिपिक - हेनरी वेगस, शिपाई - लुसिअन गोम्स आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

सदरील पुस्तक वाटप कार्यक्रमात समाजातील गरीब व आर्थिक दृष्ट्या मागास असणाऱ्या माऊंट कर्मेल शाळेतील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात गणवेश वाटप करण्यात आले.

## आजपासून भारत-इंग्लंड पहिली कसोटी

# टीम इंडियात गिल पर्वाला होणार प्रारंभ

**हेडिंग्ले : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेतील पहिला सामना शुक्रवार (दि. २०)पासून हेडिंग्ले येथे खेळला जाणार आहे. रोहित शर्मा, विराट कोहली आणि आर. अश्विन यांच्या निवृत्तीनंतर संक्रमणाच्या टप्प्यातून जात असलेल्या टीम इंडियासाठी ही मालिका आव्हानात्मक असणार आहे. पहिल्यांदाच शुबमन गिल संघाचे नेतृत्व करीत आहे.



भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेपासून नव्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप साखळीची सुरुवात करणार आहे. या मालिकेचा प्रारंभ हेडिंग्ले कसोटीपासून होणार आहे. इंग्लंडमध्ये मालिका जिंकणे भारतीय संघासाठी सोपे नसणार आहे, कारण यापूर्वी भारताने २००७मध्ये इंग्लंडमध्ये कसोटी मालिका १-०ने जिंकली होती. त्या वेळी राहुल द्रविड भारतीय संघाचा कर्णधार होता.

या दौऱ्यानंतर भारतीय संघ चार वेळेस इंग्लंड दौऱ्यावर गेला, मात्र भारताला एकदाही मालिका जिंकता आलेली नाही. या वेळी भारतीय संघाची जबाबदारी युवा फलंदाज शुबमन गिलकडे, तर उपकर्णधारपदाची जबाबदारी ऋषभ पंतकडे आहे. गिल पहिल्यांदाच भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. त्यामुळे त्याच्यावर दबाव असेल आणि मोठी जबाबदारीदेखील असणार आहे.

भारतीय संघाची लीड्सच्या मैदानावर कसोटीमधील कामगिरी फारशी समाधानकारक राहिलेली नाही. भारतीय संघाने येथे आतापर्यंत एकूण सात कसोटी सामने खेळले आहेत. ज्यापैकी केवळ दोन जिंकले असून चार सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. एक सामना अनिर्णित राहिला. भारतीय संघाने मागील वेळी या मैदानावर २०२१ साली कसोटी सामना खेळला होता, ज्यात डावाने पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे आगामी सामन्यात भारतीय संघ कशी कामगिरी करतो याकडे लक्ष लागून राहिले आहे.

### करुण नायर दुखापतग्रस्त

पहिल्या कसोटीपूर्वी भारताचा स्टार फलंदाज करुण नायरला दुखापत झाली आहे. त्यामुळे टीम इंडियावरील दबाव आणखी वाढला आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये केलेल्या दमदार कामगिरीच्या जोरावर नायरने सुमारे आठ वर्षांनंतर भारतीय संघात पुनरागमन केले आहे. तो सध्या उत्कृष्ट फॉर्मात आहे. मालिकेपूर्वी इंग्लंड लायन्सविरुद्धच्या अनधिकृत कसोटी सामन्यात द्विशतक झळकावून त्याने आपली निवड सार्थ ठरवली आहे, पण आता पहिल्या कसोटीपूर्वी नायरच्या बरगड्यांना दुखापत झाली. प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर सराव करताना त्याला दुखापत झाली. तो अस्वस्थ दिसत होता. दुखापत गंभीर वाटत नसली तरी याबाबत अद्याप कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही.

# मेजर लीग क्रिकेट स्पर्धेत मॅक्सवेलचे दमदार शतक

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

अमेरिकेत मेजर लीग क्रिकेट स्पर्धेमध्ये आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पहायला मिळाले आहेत. दरम्यान, ऑस्ट्रेलियाचा विस्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेलने षटकारांचा पाऊस पाडता ४८ चेंडूत दमदार शतक झळकावले.

शतक पूर्ण करताच मॅक्सवेलने ऑस्ट्रेलियाचे माजी फलंदाज आरोन फिंच आणि डेव्हिड वॉर्नर तसेच भारताच्या रोहित शर्माशी बरोबरी केली आहे. या तिघांच्या नावे नावे टी-२० क्रिकेटमध्ये आठ शतके झळकावण्याची नोंद आहे. या यादीत वेस्ट इंडिजचा ख्रिस गेल अव्वल स्थानी आहे, ज्याने २२ शतके ठोकली आहेत.

वॉशिंग्टन फ्रिडम संघाकडून फलंदाजी करताना ग्लेन मॅक्सवेलने सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना अवघ्या ४९ चेंडूत १०६ धावांची तुफानी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने दोन चौकार आणि १३ षटकार खेचले. या खेळीच्या बळावर त्याने संघाची धावसंख्या ५ गडी बाद २०८ धावांपर्यंत पोहचवली.

या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेला लॉस एंजिलिस नाईट रायडर्सचा डाव अवघ्या ९५ धावांवर आटोपला. त्यामुळे हा सामना वॉशिंग्टन फ्रिडम संघाने ११३ धावांनी आपल्या नावावर केला.




## 'वायपीबीए'चे प्रशिक्षक संजित वालेकर यांची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

योगेश पाटील बॅडमिंटन अकॅडमी (वायपीबीए)चे प्रशिक्षक संजित वालेकर, जे गेल्या अडीच वर्षांपासून उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्समध्ये प्रशिक्षण देत आहेत, त्यांची एनर्जाईज स्पोर्ट्स एलसीसी दुबई येथील दुबई बॅडमिंटन अकॅडमीत मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे.



एनर्जाईज स्पोर्ट्सच्या मालकीण स्वतः एक बॅडमिंटनप्रेमी असून त्या एकदा रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे आल्या होत्या. वायपीबीएकडून दिले जाणारे प्रशिक्षण, शिस्तबद्ध विकास पद्धती आणि खेळाडू घडवण्याची गुणवत्ता पाहून त्या खूप प्रभावित झाल्या. त्यांनी आपल्या दुबईतील सेंटरमध्ये अशीच उत्कृष्ट प्रशिक्षण प्रणाली आणण्यासाठी वायपीबीएची मदत मागितली.

या आवाहनाला प्रतिसाद देत वायपीबीएने प्रशिक्षक संजित वालेकर यांना दुबईमध्ये पाठवले असून तिथे आपल्या दर्जेदार प्रशिक्षण पद्धतीनुसार नवोदित खेळाडूंना मार्गदर्शन केले जाणार आहे. ही भागीदारी केवळ वायपीबीएच्या वाढत्या प्रतिष्ठेची पावती नाही, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रीडा शिक्षण आणि विकास यामध्ये भारताचे योगदान अधिक मजबूत करण्याचे एक पाऊल आहे. आमच्या प्रशिक्षणाच्या दर्जाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत आहे, हा एक अभिमानास्पद क्षण आहे, असे वायपीबीएलश संस्थापक योगेश पाटील यांनी म्हटले आहे. त्यांनी प्रशिक्षक संजित आणि एनर्जाईज स्पोर्ट्स एलसीसी दुबई बॅडमिंटन अकॅडमीला या नवीन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## एमआय न्यू यॉर्कची विजयी सलामी

### एमएलसीमध्ये मोनांक पटेलची वादळी खेळी

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

मेजर लीग क्रिकेट स्पर्धेत एमआय न्यू यॉर्क संघाचे प्रतिनिधित्व करत असलेला फलंदाज मोनांक पटेलने वादळी खेळी केली. तो या स्पर्धेतील एकाच डावात सर्वात मोठी खेळी करणारा अमेरिकन फलंदाज ठरला आहे. यासह त्याने कोरी अँडरसनचा रेकॉर्ड मोडून काढला.

एमआय न्यू यॉर्क विरूद्ध सिएटल ऑकर्स या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात मोनांक पटेलची बॅट तळपली. मोनांकने ५० चेंडूंचा सामना करत ९३ धावांची वादळी खेळी केली. फलंदाजीदरम्यान त्याने आठ चौकार आणि सात षटकार मारले. या खेळीच्या बळावर त्याची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली. या तुफानी खेळीसह तो मेजर लीग क्रिकेट स्पर्धेच्या इतिहासात सर्वात मोठी खेळी करणारा अमेरिकन फलंदाज ठरला आहे.



या सामन्याबद्दल बोलायचे झाले, तर मोनांक पटेलच्या शानदार खेळीच्या बळावर एमआय न्यू यॉर्क संघाने २०० धावांचा यशस्वी पाठलाग केला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना सिएटल ऑकर्स संघाने २० षटकांअखेर २०० धावांचा डोंगर उभारला होता.

एमआय न्यू यॉर्क संघाकडून धावांचा पाठलाग करताना कायरन पोलार्डने १० चेंडूत २६ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. या खेळीदरम्यान त्याने चार चौकार आणि एक षटकार मारला.

### ट्रान्सजेंडर महिला खेळाडूंसाठी अनया बांगरची विशेष मागणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटपटू संजय बांगर याचा मुलगा आर्यन बांगर हार्मोनल शस्त्रक्रिया करून मुलगी झाला. आता ती अनाया बांगर या नावाने ओळखली जाते. अनाया बांगरने बीसीसीआय आणि आयसीसीकडे एक विशेष मागणी केली आहे. ही मागणी ट्रान्सजेंडर महिलांबद्दल आहे.

उघडपणे आपली ओळख सांगणाऱ्या ट्रान्सजेंडर खेळाडू अनायाने क्रिकेटमधील समावेश आणि निष्पक्षतेबाबत मागणी केली आहे. तिने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला ट्रान्सजेंडर महिलांसाठी धोरणे तयार करण्याचे आवाहन केले आहे. हे धोरण विज्ञान आणि डेटा यावर आधारित असावे, असेही तिने म्हटले आहे.

## तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफीसह विजेत्या कर्णधाराला दिले जाणार 'पतौडी मेडल'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पतौडी कुटुंबियाचे क्रिकेटमधील योगदान लक्षात घेऊन अखेर या घराण्याचा वारसा जपण्यासाठी ईसीबी आणि बीसीसीआयने तोडगा काढला आहे. बीसीसीआयशी संबंधित एका अधिकाऱ्याने या संदर्भातील खुलासाही केला आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात होण्याआधी या द्विपक्षीय मालिकेतील विजेत्याला दिलेल्या ट्रॉफीच्या नावात बदल करण्याचा निर्णय इंग्लंड अॅण्ड वेल्स क्रिकेट बोर्डाने घेतला. २००७पासून सुरू असलेल्या पतौडी ट्रॉफीला आता तेंडुलकर-अँडरसन यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावर लिटल मास्टर सुनील गावसकर यांनीही आक्षेप नोंदवला होता. एवढेच नाही तर क्रिकेटचा देव आणि मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरनेही भारत-इंग्लंड यांच्यातील द्विपक्षीय मालिकेत पतौडी घराण्याचा वारसा जपला जावा, अशी विनंती इंग्लंड अँण्ड वेल्स क्रिकेट बोर्डाकडे केली होती.

बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार ज्या वेळी या ट्रॉफीचे नाव बदलण्याचा निर्णय घेतला त्या वेळी सचिन तेंडुलकरने ईसीबीशी संपर्क साधला. भारत-इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेच्या माध्यमातून पतौडी घराण्याचा वारसा जपला गेला पाहिजे, अशी विनंती त्याने इंग्लंड अँण्ड वेल्स क्रिकेट बोर्डाला केली. यात आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांचीही भूमिका होती. ही विनंती मान्य करण्यात आली असून मालिका विजेत्या कर्णधाराला पतौडी पदक देण्यात येणार आहे.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com